पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

वर्ष : १ । अंक चौथा । मराठी पाक्षिक । मूल्य : २५ ₹ । दिनांक : १५ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर



* उजेडापुढचा उजेड : डॉ. यशवंत मनोहर * आत्मसन्मान जागा झालाय : भंते सदानंद महास्थवीर
* कल्पना सरोज एक महालढाई * भारत बौद्धमय कसा करावा * गाईच्या पाठीवर पिसाट धर्मवाद
* गांधी आंबेडकर दुश्मनी नाही : तुषार गांधी

मेट्रो चाय

ताजगी के रंग
मेट्रो चाय के संग




TEACOFFEE ASSOCIATION

WNK INDUSTRIES PVT. LTD.

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
सतीश डोंगरे, सचिन ओहाळ

**संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :**
११, तळमजला, बी. ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग,
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.),
मुंबई - ४०० ०१६

**मुद्रक**
विकास प्रिंटिंग ॲण्ड कॅरिअर्स प्रा. लि.
३२, एमआयडीसी, सातपूर, नाशिक - ०७

**संपर्क**
८८८८५४१८२२
९५८८४५११५१

Email :
thepeoplespost2014@gmail.com
Website :
www.peoplespost.in
Facebook :
@thepeoplespost
(या अंकातील लेखांचे हक्क सुरक्षित)

**जाहिरात विभाग**
संपर्क : ९८२१४४५४०९/८८०५१५१४५२

**वर्गणीदारांसाठी संपर्क**
सचिन : ७३५००९१५६९

**अंकासाठी संपर्क**
८८८८५४१८२२ (Whatsapp)

**वर्गणी : वार्षिक ५०० रुपये**

**(वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट)**

पाक्षिक **द पीपल्स पोस्ट** समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : १
अंक ४, ता. १५ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर

**संपादकीय...**

| | |
|---|---|
| उजेडापुढचा उजेड- डॉ. मनोहर यशवंत | ८ |
| भागवतांची भाकडकथा - जयदेव डोळे | १३ |
| राष्ट्र आणि माणूस - डॉ. अनंत राऊत | १७ |
| गांधी-आंबेडकरांची दुश्मनी नव्हतीच - तुषार गांधी | २१ |
| धम्माने आत्मसन्मान वाढवला - भन्ते सदानंद महास्थवीर | २६ |
| महालढाई बनल्या आहेत कल्पना सरोज | ३० |
| बहुजनांचा विद्रोही लेखक - डॉ. आ. ह. साळुंखे | ३६ |
| भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म - बी. जी. वाघ | ३८ |
| गायीच्या पाठीवरून पिसाट होतोय धर्मवाद | ४० |
| पारधी झाले पाटील | ४२ |
| मॅडम स्पीकर | ४३ |
| कोल्हांटउडी | ४५ |
| कोण काय बोलतं | ४६ |

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी विकास प्रिंटिंग ॲण्ड पॅकेजिंग, सातपूर, नाशिक येथे छापून फ्लॅट नं. ४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१ ००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. ✲ संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील.) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत, प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. RNI.Reg.No. MAHMAR49026

# ‘द पीपल्स पोस्ट’चा दिवाळी विशेषांक




अल्पावधित महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर लोकप्रिय ठरत असलेल्या **‘द पीपल्स पोस्ट’**चा दिवाळी विशेषांक सर्वार्थाने वाचकांसाठी बौद्धिक मेजवाणी घेऊन येणारा असणार आहे. समाजाला आणि देशाला भेडसावणारा **‘आरक्षण’** या विषयावर सर्वव्यापी चर्चा विशेषांकात घडवून आणली जाणार आहे. रावसाहेब कसबे, डॉ. सुखदेव थोरात, निवृत्त न्यायाधिश पी. बी. सावंत, बी. जी. कोळसे-पाटील, बी. एन. देशमुख, माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ, प्रा. श्रावण देवरे आदि दिग्गज या चर्चेत सहभागी होणार आहेत.


**आपला अंक आताच राखून ठेवण्यासाठी आम्हाला ८८८८५४१८२२ या व्हॉटस्अप क्रमांकावर संपर्क साधावा.**

# भारत बौद्धमय कसा करायचा?

डॉ. बाबासाहेबांनी आपल्या संघर्षमय आणि लढाऊ आयुष्यात देशासाठी, समाजासाठी आणि मूकनायक, बहिष्कृत असलेल्या माणसासाठीही अनेक स्वप्नं पाहिली होती. बरीच स्वप्नं त्यांनी आपल्या कर्तृत्वानं पूर्ण केली. नवं राष्ट्र जन्माला घालण्याचा मार्ग राज्यघटनेद्वारा मोकळा करून दिला. कायद्यासमोर सर्वांना समान बनवून पिढ्यान्पिढ्या छळणाऱ्या वर्णव्यवस्थेला जबरदस्त तडाखा दिला. निसर्गानं दिलेलं पाणी सर्वांना स्वाभिमानानं ओंजळीत घेता येईल अशी व्यवस्था केली. लोकशाहीच्या शिडीवर पाऊल ठेवून कुणालाही कळसावर जाण्याची मुभा करून दिली. शिक्षण हक्क बनला. एकूणच काय तर वामनदादांच्या शब्दात कोटी-कोटी कुळांचा उद्धार झाला. हे सारं खरं असलं तरी त्यांची काही स्वप्नं अपुरी राहिली हेही वास्तव आहे. दलित जमात सत्ताधारी जमात बनल्याचं पाहायचं होतं आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे सारा भारत बौद्धमय बनवायचं होतं. बाबासाहेब आपल्यात आता नाहीत त्यामुळं ही अपुरी स्वप्नं स्वाभाविकच आपल्या खांद्यावर उतरली आहेत. आपल्या म्हणजे अनुयायांच्या, भक्तांच्या नव्हे!

महापरिनिर्वाणाच्या काही दिवस अगोदरच नागपूरच्या दीक्षाभूमीवर बाबासाहेबांनी पाहिलेलं स्वप्न म्हणजे भारत बौद्धमय करण्याचं. बासष्ट वर्षांपूर्वी पाहिलेल्या या स्वप्नाचा प्रवास कुठंवर झाला हे पाहण्याची जबाबदारीही आपलीच आहे. बाबासाहेबांचं स्वप्न त्यांच्या हयातीतच दीक्षाभूमीवर उगवलं होतं. त्याची हळूहळू का होईना पण वाढीकडे वाटचाल होतेय हेही खरंय; पण स्वप्नपूर्तीचा क्षण मात्र लांब लांब पडतोय हे वास्तव आहे.

एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की, बाबासाहेबांनी आपल्याला धर्म दिला नव्हता तर धम्म दिला होता. धर्माची जागा धर्माला नव्हे तर धम्माला दिली होती. धम्म म्हणजे विज्ञाननिष्ठा, समता, बंधुता, बुद्धविचार घेऊन जगण्याची एक पद्धती आहे. जगण्याची एक रीत आहे. देव-धर्माशी तिचा संबंध नाही तर मानवतेचा घोष करत आपलं आयुष्य सुंदर, सुगंधी, विकारमुक्त, तृष्णामुक्त करून जगण्याचा तो एक सुंदर मार्ग आहे. या मार्गाचं वैशिष्ट्य म्हणजे तो आतून आणि बाहेरून असतो. 'अत्त दीप भव' म्हणजे आतलं जग उजेडमान, प्रकाशमान करणं आणि हाच उजेड बाहेर वापरून बाहेरचं जगही सुंदर करणं होय. आपलं भौतिक जीवन आणि आतलं जीवन किती धम्ममय झालं याचा विचार आपणच करायला हवा आणि आपणच त्याचं ऑडिट करायला हवं.



वर्षानुवर्षे आपल्या जिन्सचा भाग बनलेला धर्म आणि देव बाजूला सारून उजेडाच्या म्हणजे धम्माच्या जगात पाऊल ठेवणं तसं कठीण असतं; पण आपण बाबासाहेबांची प्रेरणा घेऊन असं पाऊल टाकलं आणि आपणच आपला इतिहास घडविला. आता इतिहास अधिक व्यापक, विस्तृत करण्याची वेळ आली आहे. अन्य जाती, जमाती मोठ्या प्रमाणात धम्मात आल्या पाहिजेत. त्यांचा द्वेष करून हे काम होणार नाही तर त्यांच्यावरही करुणेची झालर टाकायला हवी. जे बुद्धिस्ट झाले त्यांचं पुढं काय झालं हेही पाहायला हवं आणि इतरांनाही उजेडात यायला प्रवृत्त करायला हवं. उजेडात आल्यावर जातींचा काळोख आपोआप संपून जातो. परस्परात रोटीबेटी व्यवहार व्हायला हवेत. परस्परांचे सुख-दुःख वाटून घेता आलं पाहिजे आणि हे करण्याची जबाबदारी स्वाभाविकच नवबौद्धांवर आहे.

धम्माच्या प्रसाराची कल्पना करताना सर्वप्रथम आपणही आतून-बाहेरून बौद्धमय व्हायला पाहिजे. केवळ त्रिशरण म्हणून, केवळ विहारात जाऊन, केवळ झेंडा फडकवून हे साध्य होत नाही, तर सर्वप्रथम आपली एकूण जीवनशैलीच बौद्धमय, धम्ममय बनवली पाहिजे. अजून अनेक जण दरडीवर पाय ठेवून आहेत. आपल्याला पशू, गुलाम बनवणाऱ्या जुन्या देवाधर्माकडेही ते आकृष्ट होतात आणि त्रिशरणही म्हणतात. लक्षात ठेवा जे दोन्ही दरडींवर पाय ठेवून उभे राहतात त्यांना कधीच प्रवास करता येत नाही. जागच्या जागीच ते थांबतात आणि धम्म तर प्रवास करायला शिकवतो. प्रवासासाठी वाट दाखवतो. धम्म स्वीकारल्यानंतरही आपल्या मनाला लटकून राहिलेली वटवाघुळं सर्वप्रथम हुसकून लावली पाहिजेत. धर्म आणि धम्म एकाच ठिकाणी मिसळून चालत नाही; कारण एक बिघडवतं आणि दुसरं घडवत असतं.

धम्माचा विस्तार-प्रसार करण्यात सामान्य माणसाबरोबरच भन्तेवर्गाची खूप मोठी जबाबदारी आहे. आठवड्यातून एकदा तरी ते बौद्धतराकडे जातील, त्याचं प्रबोधन करतील, त्याच्याकडे धम्मदान मागतील तर एक पूल तयार होईल. होऊ शकतो; पण असं घडलं तर! असं मुळातच घडत नाही असंही नाहीय; पण ही कृती गतिमान व्हायला हवी. धम्म कोणी सांगितला नाही, समजून दिला नाही म्हणूनही अनेक जण परिघावर आहेत. ते सारे आत येतील तेव्हा बाबासाहेबांनी पाहिलेल्या स्वप्नांकडे यशाचं पाऊल टाकण्यास मदत होणार आहे. वर्षानुवर्षे आपल्या मनात भरवलेला कर्मठपणा, भेदाभेदाची भावना हे सारं काही फेकून धम्मप्रसाराचं काम करावं



१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे बौद्ध धर्माची दीक्षा घेताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दुर्मिळ छायाचित्र...

लागणार आहे. ते करण्यासाठी केवळ पूजापाठात अडकून चालणार नाही तर चकाकणाऱ्या उजेडाशी मैत्री करावी लागणार आहे. काही झालं तरी भन्तेंना समाजात खूप आदराचं स्थान आहे. त्याचा लाभ धम्माचा परीघ विस्तारण्यासाठी करायला हवा.

सर्वप्रथम आपण स्वतःलाच हजार वेळा सांगितलं पाहिजे की, मी धर्मवादी नाही तर धम्मवादी आहे. धर्मवादाच्या आणि मूलतत्त्ववाद्यांच्या लाटांना मी बळी पडणार नाही. काही झालं तरी मी कोणत्या अमानवी, चमत्कारी शक्तींना शरण जाणार नाही. शरण जाईन तो बुद्धालाच या निर्धारानं जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सारं काही बदलू शकतं आणि आपण ते बदलू शकतो; कारण बुद्ध आणि भीमानं आपल्यात लढण्याचं बळ खचाखच भरलं आहे. त्याचा विधायक वापर केला तर आपण आपल्या जिन्समधील जीर्ण भाग फेकू शकतो. पण देवाची जागा बुद्धाला देऊन आणि बाबासाहेबांना केवळ भक्तीचं साधन बनवून आपण फार मोठा पल्ला काही गाठू शकणार नाही. नागपूर आणि दीक्षाभूमी केवळ तीर्थक्षेत्र नाही तर क्रांतीक्षेत्र आहे हे मान्य करायला हवं. ज्यांना हे मान्य झालं आहे त्यांनाच भारत बौद्धमय करेन, ही बाबासाहेबांची गगन हादरवणारी प्रतिज्ञा ऐकू येईल. आम्हाला ती ऐकू येते आहे. आशा आहे ती तुम्हाला ऐकू येत नसेल तर निदान आता तरी चष्म्यावर बसलेली धर्माची धूळ झटका. मंत्रतंत्रांनी विटलेले कान हलवून हलवून स्वच्छ करा. मग तुम्हीही तीच क्रांती घोषणा ऐकू शकाल की, 'सारा भारत बौद्धमय करेन...'

बाबासाहेबांनी आपल्याला असा एक धम्म, असा एक बुद्ध देऊन ठेवलाय की, तो जगण्याच्या सर्व वाटा-वळणांवर आपला हात गच्च पकडून ठेवतो. जगणं सुंदर करण्याचा आणि ते धैर्यानं जगण्याच्या प्रेरणा देतो. आपली जबाबदारी धम्म टिकवून ठेवण्याची आणि त्याचा विस्तार करण्याची आहे. काळ कसाही आला तरी बुद्धानं आपल्या काळजात तयार केलेला उजेड आपल्या सोबत राहणार आहे. बुद्धाचं तत्त्वज्ञान किती श्रेष्ठ आणि काळाला पुरून राहणारं आहे, काळाच्या हातात हात घेऊन चालणारं आणि प्रत्येकाला 'अत्त दीप भव' शिकवणारं आहे याबाबत एक जातककथा आहे. बोधिसत्व एक कुशल कप्तान आहे अशी कल्पना करून ती लिहिलीय. जर बोधिसत्व जहाजाचा कप्तान असेल तर समाजरूपी जहाजाला कसलाच धोका नसतो. एकदा बोधिसत्व एका जहाजावर गेला. धन दौलतीनं, हिरे-माणकानं भरलेलं हे जहाज असतं. प्रवासात बोधिसत्व आंधळा होतो. सर्वांना काळजी वाटते; पण कुशाग्र बुद्धिमतेचा बोधिसत्व अद्भुतपणे हे जहाज सुरक्षितपणे किनाऱ्यावर नेतो. दलितांची अवस्था समुद्रात फसलेल्या, गटांगळ्या खाणाऱ्या जहाजासारखी होती. बाबासाहेबांनी बोधिसत्वरूपी कप्तान दिलाय. वादळं येतील-जातील, लाटा गिळण्यासाठी उठतील आणि शांतही होतील. कुणी लुटारू येतील आणि जातीलही; पण आपला प्रवास चालू राहणार आहे. सुरक्षित राहणार आहे; कारण बोधिसत्व कप्तान असलेल्या जहाजात आपण बसलोय. सर्वांचाच प्रवास सुंदर व्हावा. अगदी राष्ट्राचासुद्धा प्रवास सुंदर व्हावा म्हणून बाबासाहेबांची प्रतिज्ञा पूर्ण करण्याची जबाबदारी घ्यायला हवी. 'सारा भारत बौद्धमय करेन'.


हिंदुत्व कितीही आक्रमक झालेय. सत्तेचा दुरुपयोग करून त्यांनी कशाही हालचाली केल्या. कथित विशाल एकसंध हिंदुत्वात कुणालाही घुसडायचा प्रयत्न केला तरी धम्म मात्र कायम राहणार आहे. राहत आला आहे. शत्रूच्या असंख्य हालचालींना तो पुरून उरला आहे; कारण जो संपत नाही तो धम्म असतो. जो अखंड चालत असतो तो धम्म असतो. अखिल मानवजातीसाठी जो असतो तो धम्म असतो. जो प्रेमाच्या जोरावर शत्रुत्व, वैर, द्वेष संपवतो आणि साऱ्या जरांना हुसकून लावतो तो धम्म असतो. त्याला मरण नाही. आपला प्रिय शिष्य आनंदशी संवाद करताना बुद्ध एक आठवण सांगतात, जेव्हा माझ्यावर जरा हल्ला करत होते. येत होते मारायला तेव्हा मी म्हणालो, 'हे दुर्जना मी मरणार नाही. जोपर्यंत या जगातील बंधू-भगिनी आणि उभयालिंगी सामान्य शिष्य समर्थ होत नाहीत, शहाणे आणि प्रशिक्षित होत नाहीत, ग्रंथाशी (विचारांशी) त्यांची चांगली ओळख होत नाही, आयुष्यातील लहान-मोठी कर्तव्ये ते पूर्ण करत नाहीत, नैतिक उपदेशानुसार ते चालत नाहीत, शिकवण आत्मसात करून इतरांना त्याप्रमाणे वागायला सांगत नाहीत, चुकीच्या शिकवणुकीला आव्हान देत तिला खोटे ठरवत नाहीत, परिणामकारक सत्याचा दूरवर प्रसार करत नाहीत तोपर्यंत मी मरणार नाही'. (संदर्भ : भारतातील बौद्धधम्म - गेल ऑम्वेट)

बुद्धानं आपल्याला एक मोठा विश्वास देऊन ठेवलाय. तो सार्थ करून दाखवलाय. हा विश्वास सतत आपल्या आत आणि बाहेर असायला हवा. आपली जबाबदारी अंधारातल्या समूहाला धम्म प्रकाशात नेऊन सोडण्याची आहे.

***



– डॉ. यशवंत मनोहर



# उजेडापुढचा उजेड म्हणजेच बुद्ध!

*बुद्ध म्हणजे अखंड तेजोमयी, करुणामयी होत जाणारा उजेड. तो सर्व अंधार चिरत पुढं पुढं जातो. मानवी जीवनाला चिकटलेली कर्मकांडांची, धर्मांधतेची, मूलतत्त्ववादाची, विषमतेची वटवाघुळे हुसकून लावतो. प्राणिमात्रासाठी बुद्ध असं एक जीवन तयार करतो की तिथं कधी द्वेषाच्या, स्वार्थाच्या सावल्या लांब नाही होत. होतात त्या उजेडाच्याच सावल्या. विशेष म्हणजे त्याही उजेड मानत असतात. एका उजेडसावलीतून दुसरी उगवते आणि साऱ्या अवकाशावर स्वतःच पांघरूण घालते.*

बुद्धांना एडविन अर्नोल्ड यांनी आशियाचा प्रकाश म्हटले. मी बुद्धांना कोणताही किनारा नसलेले उजेडाचे अंतरिक्ष मानतो. पुढे कधीही या अंतरिक्षाचा किनारा निर्माण होणे अशक्यच आहे. बुद्ध नावाची चौकटविहीनता कोणत्याही चौकटीत मावतच नाही. बुद्धांनी संपूर्णच विश्वाला आपले काळीज मानले. हे काळीजच त्यांच्या शब्दात आहे आणि विश्वहिताची अक्षय पौर्णिमा ही त्यांच्या काळजातही आहे. आपण सर्वांनीच या पौर्णिमेची इच्छा समजावून घ्यायला हवी. बुद्धांना मी उजेडांपुढचा उजेड म्हणतो. जगात उजेडाची तत्त्वज्ञाने आहेत. वैज्ञानिकांना लागणाऱ्या नवनव्या शोधांचा उजेड आहे. क्रांत्यांचा उजेड आहे. बिनकाट्यांच्या सज्जनांचा उजेड आहे. अंधारात भरकटलेल्या वाटांना बाहेर आणणारा मार्गदर्शक उजेड


आहे; पण दुनियेतील या सर्वच उजेडांना सम्यक दिशा देणारा एक उजेड जगाजवळ आहे. या उजेडांच्या उजेडाचे नाव 'बुद्ध' आहे. अंधाराला उजेड शिकवणाऱ्या आणि उजेडांनाही उजेड शिकवणाऱ्या या बीजउजेडाला दुनिया आता बुद्ध म्हणते.


जगातल्या उजेडांनाही मार्गदर्शन करणारा आणि स्वयंदीप झालेल्यांनाही उजेडाची सतत पुनर्रचना करायला लावणारा नवनवोन्मेषशाली उजेड असे आपण बुद्धाला का म्हणतो, या प्रश्नाचा थोडा विचार करावा असे मला वाटते. जगातल्या सर्वच लोकांनी एक गोष्ट काळजीपूर्वक लक्षात घ्यायला हवी, ती म्हणजे बौद्ध हा धर्म नव्हे. धर्माच्या व्याख्येत बुद्धाची इहवादी आणि बुद्धिवादी जीवनशैली बसूच शकत नाही. शिवाय लोकायतप्रमाणे बुद्धाने कुठलाही धर्म स्थापन केला नाही. माणसांची मने खुली, प्रवाही आणि पुनर्रचनाशील ठेवण्यासाठी बुद्धांनी धर्म ही संस्थाच किंवा ती रचनाच नाकारली.

बदल ही जीवनाची प्रकृतीच आहे. हे बदल माणसांना नवे प्रश्न विचारीत असतात. जुन्या उत्तरांना हे नवे प्रश्न जुमानत नाहीत. म्हणून नवी उत्तरे शोधावी लागतात. विचारांची आणि विचारसरणींचीही पुनर्रचना करावी लागते. बुद्धांनाही याची कल्पना आहे आणि चिकित्सा करीत विचाराचे अद्ययावतीकरण करीत राहिले पाहिजे, असे बुद्धांचेही म्हणणे आहे. विचाराने काळासोबतच नव्हे तर काळाला सम्यक दिशा देत काळाच्या पुढे चालले पाहिजे असे बुद्धांना वाटते. बुद्ध कधीही मूलतत्त्ववादी होत नाहीत ते मुक्ततत्त्ववादीच राहतात त्याचे हेच कारण आहे. त्यामुळेच तर आजही आपण त्यांना उजेडापुढचा उजेड किंवा सतत नवनवी पालवी येणारा उजेड म्हणतो.

द्वेष, भ्रम आणि हिंसा याशिवाय धर्म जगाला काहीच देऊ शकत नाहीत हे माहीत असल्याने बुद्ध स्वतःही धार्मिक नव्हते आणि धार्मिक माणसे निर्माण करणे हा त्यांचा उद्देशही नव्हता. सतत बदलणारी, स्वतःची आणि जीवनाची सतत पुनर्रचना करणारी बुद्धिवादी माणसे निर्माण करणे हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा उद्देश आहे. समाजक्रांती हेच या तत्त्वज्ञानाचे ध्येय आहे. मानवी मनाची पुनर्रचना केली की बुद्धाचा साम्यवाद (Vol.17.449) शक्य होतो. ही क्रांती अहिंसेच्या मार्गानेच शक्य आहे.

बुद्धाचे तत्त्वज्ञान प्रतीत्यसमुत्पाद, अनित्यता, चिकित्सेची निरंतरता आणि मानवी आयुष्याचे स्वयंदीपत्व या चार मुख्य पंखांनी न थकता आणि न थांबता विश्वभर उडत आहे. प्रतीत्यसमुत्पादात विज्ञानशीलता आणि बुद्धिवाद या गोष्टी येतात. अनित्यतेत परिवर्तनशीलता आणि सतत पुनर्रचनाशीलता या गोष्टी येतात. चिकित्सेत सद्सद्विवेक म्हणजे सगळी सम्यक आजीविका येते. स्वयंदीपत्वामध्ये संपूर्ण निरामय माणूसपण किंवा स्वयंनिर्भरता यांचा अंतर्भाव होतो. हीच माणूसपणाच्या सौंदर्याची पौर्णिमा असते. हेच नव्या आणि स्वतंत्र माणसाच्या





निर्मितीचेच प्रबंधन आहे. माणूस ईश्वरसत्ताक, आत्मासत्ताक राजसत्ताक, हुकूमशहासत्ताक, पुरुषसत्ताक, अंधश्रद्धासत्ताक वा असत्यसत्ताक अशा कोणत्याही सत्ताकांचा अंकित नसतो. ही वर्चस्वाच्या निर्मूलनाची आणि माणसाच्या स्वयंदीपत्वाचीच प्रस्थापना असते. म्हणजे स्वतःच्या मुक्त प्रज्ञेची आणि प्रतिभेचीच प्रस्थापना असते. स्वतःच्या सम्यक डोक्याने जगणं हाच मुक्त माणसाच्या अस्तित्वाचा इत्यर्थ असतो. कणा आणि मान ताठ असली की मानवी स्वातंत्र्यही अजिंक्य ठरते. कोणाला शरण जाऊ नका. (Vol.17.376) ईश्वरच नाही तर भक्ती नाही. आत्मा नाही तर पुनर्जन्म नाही. निर्भय, स्वतंत्र आणि पुनर्रचनाशील माणूस हेच माणुसकीच्या सूर्यपौर्णिमेचे रूप बुद्धांना अभिप्रेत आहे. विचारांची, ज्ञानाची, सत्याची, मानवी संबंधाची अधिकाधिक उज्ज्वल होत जाणारी रचना ईश्वर, आत्मा अशा भ्रमाशिवायच शक्य आहे. इतर माणसांना तळहातावरील फोडाप्रमाणे किंवा स्वतःच्या काळजाप्रमाणे जपणारा माणूस हाच बुद्धांच्या उजेडाचा अर्थ आहे. म्हणून तर आपण बुद्धांना उजेडांपुढचा उजेड म्हटले आहे.

बुद्ध म्हणजे बुद्धांचे तत्त्वज्ञान! बुद्धांचे ज्ञान म्हणजे बुद्धांच्या तत्त्वज्ञानाचे ज्ञान, बुद्ध समजावून घेणे म्हणजे बुद्धांची नास्तिकता समजावून घेणे होय. ईश्वर, परलोक आणि वेद अमान्य करतो त्याला नास्तिक म्हटले जाते. लोकायतही आणि बुद्धही नास्तिक आहेत. बुद्धाचे ज्ञान म्हणजे ज्ञानाचे ज्ञान आणि हे ज्ञान ज्याला होते त्याच्या मनातून अज्ञानाचे, परद्वेषाचे आणि सर्वच श्रेण्यांचे निर्मूलन होते. हे सर्व डोक्यात घेणारा माणूस स्वतंत्र, स्वयंदीप आणि भेदातीत होतो आणि आपल्या नितळ निरामय माणूसपणाच्या थेट उगमाजवळ पोहोचतो. या क्रांतीचेच नाव बुद्ध आहे. ज्यांची बोटे कापली जातात तेही आणि बोटे कापणारे अंगुलीमालही या उजेडाचे बोट धरून आपल्या निरामय माणूसपणाच्या पहाटेपाशी पोहोचतात. इथून त्यांचे जीवन पूर्ण प्रकाशमयच होऊन जाते. उजेडापुढच्या उजेडाची ही अपूर्वता आहे. अंधार आपोआप नष्ट होत नाही. व्यक्तीला त्यासाठी उजेडात तरी जावे लागते किंवा स्वयंतेज तरी व्हावे लागते, या स्वयं कार्यशाळा म्हणजे बुद्ध!

विषमता आणि शोषण पवित्र मानले जात होते आणि ज्ञान अज्ञानासारखे वागायला लागले होते त्यावेळी बुद्धांनी ही ज्ञानाची पुनःस्थापना करणारी आणि सत्याला निर्भय करणारी क्रांती केली. ती बुद्धिवादी, विज्ञानशील आणि सतत पुनर्रचनाशील आहे. शिवाय मनातील भेदसत्ताक पार जळूनच गेले आहे अशी व्यक्ती जगात कुठेही असली तरी ती बौद्धच असते. तिने दीक्षा घेतली नसेल, तिला पंचशील माहीत नसेल पण अशी नितळ वा निरुपाधिक व्यक्ती बौद्धच असते. जगात अशा बौद्धांची वा अशा विस्मधारकांची संख्या इतर कोणत्याही धर्माच्या लोकांपेक्षा जास्त आहे.

बुद्ध म्हणजे असीम करुणा, असीम समता, असीम



भगिनीता आणि बंधुता! आणि बौद्ध म्हणजे पूर्ण स्वतंत्रता, पूर्ण बुद्धता, पूर्ण स्वयंदीपता आणि सर्वहितैषी वैश्विकता! द्वेषाला, विषमतेला, वर्चस्वाला आणि कुणाला लुटण्याच्या इच्छेला मनात थारा देत नाही तो खरा बौद्ध! जो माणूस ईश्वरातीत, धर्मातीत, जात्यतीत आणि लिंगभेदातीत अशा आपल्या मूळ माणूसपणाचा उत्सव झालेला आहे तोच खरा बौद्ध असतो.


माणसांच्या मनांची आणि समाजाची श्रेणीरचना बदलू नये याची काळजी घेणाऱ्या वर्चस्ववाद्यांनी या इहवादी आणि क्रांतिकारी बुद्धाच्या विरोधात विकृत केलेला अवतारी बुद्ध उभा केला. परदेशातील लोकांनी बुद्धाचा 'धर्म' नेला. क्रांती नेली नाही. बुद्धाचे अंतर्विरोधविहीन इहवादी तत्त्वज्ञान नेले नाही. त्यांच्या पूर्वधर्मातील भ्रमांची अडचण होणार नाही असा 'बुद्धधर्म' नेला. बुद्धाच्या क्रांतीची आग बाजूला सारली गेली आणि उरलेल्या कलेवराला लोकांनी 'बौद्ध धर्म' म्हटले. पायाभूत बुद्ध तत्त्वज्ञानाचे आणि त्याच्या निरंतर क्रांतीचे खरे नुकसान इथे झाले.

एहिपस्सिको म्हणजे सम्यकबुद्धीच्या निकषाने सतत चिकित्सा करणे! सर्वच गोष्टींची म्हणजे साहित्याची, जीवनाची, माणसाच्या वर्तनाची आणि नैतिक मूल्यांचीही चिकित्सा ती असते. बौद्ध माणूस फक्त स्वतःच्या सद्विवेकाचाच निर्णय प्रमाण मानतो. चिकित्सेच्या आगीतून सहीसलामत बाहेर पडेल तेवढेच स्वीकारतो. कोणीही काहीही म्हटले तरी संमतीची मान हलवतोच तो बौद्ध माणूस नव्हे. बौद्ध माणूस सद्विवेकालाच आपले प्रमाणशास्त्र मानतो. याचा अर्थ तो विज्ञानप्रक्रियेचेच अनुसरण करतो. अनुसरण म्हणजे चिकित्सापूर्ण स्वीकार! विज्ञान म्हणजे नवनवोन्मेषमयता! विज्ञान म्हणजे प्रतीत्यसमुत्पाद आणि विज्ञान म्हणजे सतत प्रयोगशीलता! विज्ञान म्हणजे नवनव्या उजेडांची चिकित्सा आणि नवनव्या उजेडांच्या भेटी. विज्ञान म्हणजे थांबा नसलेला प्रवास! विज्ञान म्हणजे सम्यक आजीविका! विज्ञान म्हणजे अणूंना आलेला सकल प्राणिमात्रांचा फुलवरा! माणूस मूलतःच आणि प्रकृतितःच विवेकशील असतो असे मानते ते विज्ञान. याचा अर्थ बुद्ध म्हणजे विज्ञान. म्हणून बुद्ध ही संकल्पना विज्ञान या अर्थानेच वापरली जाते. विज्ञानाचे अन्न म्हणजे अभेदसरणता, सम्यकसरणता! बुद्ध म्हणजे मूळ निरामय माणसांचे साम्यवादी माणूसपण. या साम्यवादी माणूसपणाकडे माणसांना घेऊन जाणारी अजिंक्य प्रकाशाची वाट म्हणजे बुद्ध. माणसाला उजेडापुढच्या उजेडाचे नागरिक करते त्या विज्ञानाचेच नाव बुद्ध आहे. सिद्धार्थ विज्ञान झाला. म्हणजे सिद्धार्थ बुद्ध झाले!

बुद्ध असे आहेत त्यांच्यात कोणतीही गूढता नाही. चमत्कार नाही. कोणतीही अंधश्रद्धा नाही. कोणालाही निर्दयपणे तपासून घ्यायला सांगणारे ते कलदार तत्त्वज्ञान आहे. आदीअंती केवळ करुणा, केवळ सज्जनपणा आणि केवळ विश्वासार्हता असा हा नितळ प्रकल्प आहे. अंगुलीमालपणाचे विसर्जन करणारा कोणताही अंगुलीमाल बौद्ध होऊ शकतो. कोणाचाही लाजीम आणि कोणापुढेही लाचार होत नाही त्या माणसाला बौद्ध म्हणावे. कण्याचे आणि निष्ठांचे पोलाद करू शकतो तो माणूस बौद्ध असतो. निष्ठा कुणाकडे गहाण टाकत नाही, ती कोणाला विकत नाही आणि निष्ठा एवढाच आपल्या जगण्याचा अर्थ आहे असे मानतो त्या माणसाला आपण बौद्ध मानतो. जो माणूस बौद्ध असतो तो नव्या प्रश्नांवर मात करण्यासाठी जुनी कालबाह्य उत्तरे वापरीत नाही. नवी जिवंत आणि सर्जनशील उत्तरे शोधतो, नव्या प्रश्नांना नवी उत्तरे हवी असतात. कारण नवी व्हिजनरी उत्तरे नवे प्रश्नही निर्माण करतात. बौद्ध माणूस नवनवी स्पष्टीकरणे, नवनवी क्षितिजे निर्माण करतो. आपले डोके नवनव्या स्थितीत नवनव्याने उगवत ठेवतो. विचाराला, मनाला, प्रज्ञेला, प्रतिभेला आणि जिज्ञासेला कुठं बांध घालत नाही. नवनव्याने सतत जन्माला येण्यालाच बौद्ध माणूस आपले जगणे मानतो.

विषमता, शोषण, देवदैववाद आणि मूठभरांचे वर्चस्व कायम ठेवू इच्छिणारांनी बुद्धाच्या क्रांतिप्रबंधाला धर्म केले. धर्माच्या विरोधात उफाळलेल्या धर्मातीत विज्ञानाला त्यांनी धर्म केले. एखाद्या तत्त्वज्ञानाला क्रांतीपासून तोडले की परिवर्तनाची हत्या सहजच करता येते आणि दीर्घकाळासाठी समाजाला गाठवून ठेवता येते. क्रांतिकारी तत्त्वज्ञानांना निकामी करण्यासाठी उत्सवांचा उपयोग केला जातो. महानायकांचे नामगजर क्रांतीची तत्त्वज्ञाने धुक्यात ढकलण्याचे काम करतात. समाजाची अवस्था गॅस संपलेल्या सिलिंडरसारखी होते. असे दिसते की जगाने 'बुद्धधर्म' नेला, क्रांतिबुद्ध नेला नाही. बाबासाहेबांना बुद्धाचे क्रांतिरूप हवे होते आणि जागतिक बुद्धधर्मीयांचा विरोध पत्करूनही बाबासाहेबांनी या क्रांतिबुद्धाची पुनर्रचना केली. ही पुनर्रचनाही आता विज्ञानाप्रमाणे कोणताही थांबा मानत नाही.

बौद्ध हे माणसाच्या वैज्ञानिक वागण्याचे नाव आहे. ते माणुसकीच्या आविष्काराचे सौंदर्य आहे. बौद्धत्व ही माणूस होण्याच्या घडणीची गोष्ट आहे. बौद्धत्व हे नितळ माणूसपणाचेच भाषांतर आहे. बौद्ध कपड्यांचे, कोणत्याही पूजेचे, परावलंबित्वाचे वा अंधाराचे नाव नव्हे. बौद्धत्व ही



नवनवा प्रकाश निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. बौद्ध हे कोणत्याही कर्मकांडाचे नाव नव्हे. बौद्धत्व हे बुद्धाला निरंतर येणाऱ्या नवनव्या मोहरचे नाव आहे. कारण झाडातून फुले तशी बौद्ध माणसाच्या वागण्यातून प्रतीत्यसमुत्पाद आणि अनत्ता, विज्ञान आणि प्रज्ञान ही नक्षत्रे फुलत असतात. बौद्ध माणसाच्या मनाच्या क्षितिजात बुद्ध उगवतो आणि त्याच्या वागण्यातून सूर्य प्रकाशित होतो.

सूर्य घरोघरी जात नाही. सूर्य घेऊन किरणे घरोघरी जातात. तसेच बुद्धांचेही आहे. खुद्द बुद्ध घरोघरी जात नाहीत. बौद्ध माणसाचे वागणे बुद्ध घेऊन घरोघरी जाते. म्हणूनच बौद्ध म्हणजे उजेड आणि बुद्ध म्हणजे उजेडापुढचा उजेड असे आपण म्हणतो. हे बुद्धपण जगातील माणसांच्या डोक्यातून प्रकाशित होणे सुरू झाले तर उद्याच्या सूर्योदयापूर्वीच जग क्रांतिमय होऊन जाईल.

***



– जयदेव डोळे

# भागवतांची भाकडकथा

*जेवढे जीर्ण त्यावर संघपरिवाराची श्रद्धा असते. ज्यांना लोकशाही नामंजूर असते ते राजा, जंगल, सिंह, कुत्री यांच्या कथा सांगत हुकूमशाहीवरची आपली भक्ती दृढ करत असतात. शिकागोमधील सरसंघचालकांच्या भाषणातून पुन्हा एकदा हेच अधोरेखित झाले.*



डॉ. मोहन भागवत गुरांचे डॉक्टर आहेत. एक वर्ष त्यांनी सरकारी नोकरी केली आणि सोडून दिली. देशाचे पशुधन कमी होत चालल्याच्या काळात ते सरसंघचालक झाले. सरकारी नोकरी केली, देशसेवेचंच एक काम होते; पण त्याहीपेक्षा मोठी देशसेवा त्यांना करायची होती. त्यामुळे त्यांनी जे प्रशिक्षण उत्कृष्ट गुणांनी घेतले ते त्यांनी देशाच्या कामी म्हणजे देशातील गुरांच्या सेवेसाठी खर्च केले नाही. तरीही ते मोठे देशभक्त आहेत. लाळ्या व खुरकूत रोग मध्यंतरी खूप प्राणी खाऊन गेले. पण डॉ. भागवतांनी खूप मोठ्या देशसेवेचे व्रत स्वीकारल्याने ते त्याकडे लक्ष देऊ शकले नाहीत. कित्येक दूध व्यावसायिक दुधाळ जनावरांना इंजेक्शन टोचून जास्त दूध द्यायला लावतात आणि आपल्या सारख्यांच्या घरात येणारे दूध खराब करून टाकतात. दुधाची मागणी वाढल्याने यूरिया मिसळून दूध विकले जात आहे. छोटी बाळे, वाढत्या वयाची पोरे यांना असे दूध प्यावे लागत आहे.

परंतु डॉ. भागवत अशा दुष्कर्मांची दखल घेत नाहीत. त्यांना खूप मोठी देशसेवा करायची असल्याने ते इतक्या किरकोळ गोष्टींकडे कशाला लक्ष देतील? आपला देश डेन्मार्क किंवा न्यूझीलंड यांसारख्या दूधदुभत्याने समृद्ध देश व्हावा आणि साऱ्या पिढ्या सशक्त, निरोगी व हुशार निपजाव्यात असे स्वप्न डॉ. भागवतांनी विद्यार्थिदशेत बघितले होते. पण तेव्हाचे काँग्रेसचे सरकार किंवा नंतरची विविध सरकारे असे कसे करू देतील बरे? येऊन जाऊन गुरांचा व्यापार करणाऱ्या लोकांची ती सरकारे. **आताचे भाजपचे सरकार कसे गोमातेची काळजी घेणारे आहे. त्यामुळे डॉ. भागवतांनी दूध, तूप, लोणी आदींचे उत्पादन खूप घेऊन भारताची जवान पिढी सुदृढ व्हावी असे काही मोदी–शहा यांना सांगून करवून घेतले असते तर आपल्याला किती आवडले असते.** पण डॉ. भागवत खूप थोर देशभक्त असल्याने त्यांना त्याहीपेक्षा थोर देशसेवा करायची आहे हे आपल्याला कुठं माहीत होते? दुधाला भाव मिळावा म्हणून अनेक शेतकरी दूध रस्त्यावर ओतताना आपण पाहिले. पण तेव्हा डॉ. भागवत ते पाहत नव्हते. त्यांची दृष्टी त्याहून श्रेष्ठ अशा समस्येकडे लागली होती. शेती व शेतीला लागणारी जनावरे यांच्याशी संबंध असणारे डॉ. भागवत हे पहिले सरसंघचालक. त्यांच्या आधीच्या सरसंघचालकांचा शेतकरी, शेतकऱ्यांचे प्रश्न यांची कधी गाठ पडल्याचे दिसत नाही. गोळवलकर गुरुजी यांच्या लिखाणाचे व भाषणांचे १२ खंड प्रसिद्ध आहेत. त्यामध्ये शेती, गुरे, निसर्ग, पाऊस, पीकपाणी यांविषयी अत्यंत तुटपुंजा मजकूर आहे. बघा, म्हणजे जेव्हा गुरुजी सरसंघचालक होते तेव्हा देशाचा शेतकरी बहुसंख्येत होता. मात्र त्याची नोंद गुरुजी शेतकरी म्हणून नव्हे, तर हिंदू म्हणून घेत. स्वतः गोळवलकर एम.एस्सी (जीवशास्त्र) पदवीधर होते. त्यांनीही आपले शिक्षण आपल्या देशाच्या जीवशास्त्रीय समस्यांसाठी खर्चले नाही. त्याऐवजी त्यांना हिंदू–मुस्लिम–कम्युनिस्ट–समाजवादी–गांधीवादी आदींची समस्या अधिक मोठी वाटली. त्यामुळे गोळवलकर हेही खूप मोठे देशभक्त होते असे सिद्ध झाले.

डॉ. भागवत यांनी १७, १८, १९ सप्टेंबर रोजी दिल्लीत एका सरकारी सभागृहात लोकांना निमंत्रण देऊन आपली भाषणे ऐकायला लावली. लोकही आले बिचारे. सरकारची खप्पामर्जी व्हायची म्हणून दचकत, दबकत आले सारे. त्यातील अनेक जण सरकारी कृपा अपेक्षिणारे आणि सध्या कृपावंत असलेले होते. या तीन भाषणांतील भागवत आणि त्यापूर्वी एक आठवडा शिकागोत बोललेले भागवत यांच्यात फरक झाला. दिल्लीतील डॉ. भागवत ऐकून खरेच वाटेना. कारण विवेकानंदांच्या भाषणाचे स्मरण करण्यासाठी शिकागोत ते गेले अन् म्हणाले, ''सिंह थोडासा पेंगुळला की कुत्री त्याच्यावर हल्ला करतात आणि जंगलाच्या या राजाचे नेतृत्व हलवून सोडतात! तेव्हा हे सिंह, अशा कुत्र्यांपासून सावध राहा'' असा कोड्यातील इशारा डॉ. भागवतांनी ऐकवला. ते प्राण्यांचे डॉक्टर असल्याने सिंहाचीही सेवा त्यांनी केली असावी



असे आम्हाला वाटले. फार तर सिंह एकटा पडल्यावर कसा असतो याचा अभ्यास त्यांना झाला असावा. कुत्री कशी वागतात हे तर भागवतांना ठाऊकच असावे. आमच्यासारख्या भित्र्या, कातडीबचाव, पळपुट्या माणसांनी पैसे देऊन सिंह बघितले. पण सारेच्या सारे एकटेच होते. त्यांना पिंजऱ्यात एकटेच ठेवलेले असायचे आणि एकही कुत्रा त्यांच्या आसपास नसायचा! अगदी एखादे काळे कुत्रेही या सिंहाजवळ भटकताना आम्ही पाहिले नाही!! त्यामुळे डॉ. भागवत यांना जे ज्ञान झाले ते जंगलातील सिंहांचे असले पाहिजे. मचानीवर बसून किंवा जीपमध्ये जाळीच्या आडून डॉक्टरसाहेबांनी हे ज्ञान प्राप्त करवून घेतले असावे. या ज्ञानासाठी त्यांनी ज्या खस्ता खाल्ल्या असतील त्याबद्दल त्यांना दाद दिली पाहिजे. आम्ही पुन्हा एकदा ॲनिमल प्लॅनेट, नॅशनल जिओग्राफी असे ज्ञानाचे स्रोत धुंडाळले व डॉ. भागवत यांचा दावा खरा आहे काय, याचा तपास केला. नंतर आम्हाला एक भलतेच दृश्य बघावे लागले. सात-आठ सिंहिणी एकत्र होऊन एका सिंहाचे चावे घेतानाचे ते होते. तो भलामोठा सिंह एकटाच होता. त्याला प्रतिकारही करता येत नव्हता. अचानक एक वाहन येते, धूर सोडला जातो, त्या सिंहिणींना पळवले जाते आणि तो सिंह धडपडत कुठे तरी जातो एवढेही आम्ही पाहिले. का, तर म्हणे तो सिंह म्हातारा झालेला होता आणि त्या कळपात नव्या नराला जागा हवी होती; म्हणून सिंहिणी ती तयार करीत होत्या. त्या जुन्या सिंहाला खतम करून चक्क! हे काम खरे तर कुत्र्यांचे! म्हणजे सिंहिणींनी इतके कष्ट घेण्याची काय गरज? त्यांनी छू छू!! असे जरी केले असते तरी सारे काम निर्धारित पार पडले असते. पण त्यांचा आणि डॉ. भागवतांचा कधी संपर्कच झाला नाही, त्याला त्या काय करणार? सिंह कळपात राहणारा प्राणी असल्याचेही त्या मूर्ख, नादान, अर्धवट वाहिन्यांनी आम्हाला सांगितले होते. त्यामुळे एकटा पडलेला सिंह किंवा स्वार्थी, अप्पलपोटा, लपूनछपून शिकार करून एकटेच हरिण चापणारा सिंह आम्ही कधी पाहिलाच नाही. आता गुहेत एकटा आराम करीत असल्यास आम्हाला ते काही पाहता आलेले नाही. तेवढे जवळ जाण्याइतके धाडसी आम्ही नव्हतो. बहुधा सिंह संघातल्याप्रमाणे आपले राजेपद चिठ्ठीवर लिहून ती पाकिटात बंद करीत असतील. तो म्हातारा सिंह निरक्षर असावा. त्यामुळे त्याने सर कळपचालकाची नियुक्ती केली नाही आणि असा चावे खात बसला मुकाट! सिंह स्वतःचा वारस स्वतः नेमत नाही तर त्याला एक तर दुसऱ्या नराशी झुंजावे लागते अथवा असा सिंहिणींकडून त्याचा पायउतार होत असतो. तरीही आपण वन्यप्राण्यांचे अभ्यासक आहोत असे भासवून डॉ. भागवत कुत्र्यांची प्रशस्ती कसे करू शकले? ते नेमके सिंहाच्या विरोधात बोलले की कुत्र्यांनी प्रेरणा घ्यावी अशासाठी? उद्या कुत्र्यांच्या झुंडी एकटे सिंह शोधत हिंडू लागले तर! देशाचा 'तो' सिंह तर एकटेच राहणे पसंत करतो. त्याच्या गुहेत तो कोणालाही प्रवेश काय, डोकावूही देत नाही म्हणे. त्याला ना मित्र, ना कोणी जिव्हाळ्याचे.

गिरचे सिंह प्रसिद्ध आहेत. ते गुजरातेत आहे. नुकतीच बातमी येऊन गेली की, तिथे डझनभर सिंह वर्षभरात दगावले. परंतु तिथे एखादा कोपरा कुत्र्यांनी ताब्यात घेतल्याची एकही व्हिडिओ क्लिप व्हायरल झालेली नाही. याचा अर्थ ती खरी नाही. कोणी ट्विटरवरूनही त्याची वाच्यता केली नाही. म्हणजे कुत्र्यांच्या मालकांपैकीही कोणी नाही. ट्रोल मंडळींकडूनही अशा कुत्र्यांची खबर घेतली गेलेली नाही. म्हणजे सिंह एकटे पडले की कुत्री सरसावतात हे जे ब्रह्मवाक्य भागवत मुखे बाहेर पडले ते चुकीचे ठरते. पण परमपूज्य सरसंघचालक कधीच चुकत नसतात. त्यांना खोटे कसे ठरवायचे? ब्रह्मतेज काळवंडून जाईल ना! तेव्हा आपण जंगले, वन्यप्राणी यांच्यापासून दूर जाऊन डॉ. भागवत प्रतीकात्मक बोलले काय, त्यांनी उपमा योजली काय, ते संकेताने जे सांगायचे ते सांगून गेले काय ते पाहू. थोर माणसे नेहमी इशाऱ्याने बोलत असतात. थेटपणा आपल्यासारख्या बावळट व भाबड्या देशभक्तांचा असतो. म्हणजे इंग्रजांना बापू 'चले जाव' असे थेट म्हणाले. आपणही थेट बोलून तुरुंगात गेलो. संघाने असे थेट आंदोलन केले नाही. संघात थेट काही नसते. संकेत, प्रथा, निर्देश, दृष्टांत व निःशब्द उद्‌गार यांतून संघ स्वयंसेवकांशी संवाद करीत असतो. स्वतःला स्वतंत्र मानू लागा की झालाच तुम्ही स्वतंत्र! कशाला चळवळ करायची, असे संघ म्हणायचा. किती हुशार आहे ना संघ!

डॉ. भागवत खूप मोठे राष्ट्रसेवक आहेत. त्यामुळे त्यांनी आपल्याला विचार करायला एक कोडे दिले आहे. मोठी माणसे सदैव अशी कोडी आपल्यासारख्या मूर्ख लोकांना सांगून आपल्याला मेंदूचा वापर कसा करावा हे अप्रत्यक्ष शिकवत असतात. आता तो आपलाच मेंदू. तो हिंदुत्ववाद्यांसारखा मोठा आणि राष्ट्रभक्त थोडाच असणार! तो बिचारा आपली जात, भाषा, पगार किंवा भूक यांचा विचार करीत राहणार. धर्म, अध्यात्म, पुराणे, उपनिषदे यांत त्याला कशी गती असेल? डॉ. भागवत यांना संस्कृत येते, त्यांचे पाठांतर छान आहे आणि सरसंघचालक मंडळीस पुराणे, इतिहास व महाकाव्ये यांमधील

दाखले देण्याचा आणि श्लोक सांगण्याचा फायदा काय असतो हे माहीत आहे. पहिला, किती चपखळ उदाहरण दिले याचे कौतुक होते. शिवाय जेवढे ते जुने तेवढे ते पवित्र, सत्य आणि अढळ याची पावती देता येते आणि तिसरे, कोणीही उठून जाऊन त्या उद्धृताची तपासणी करायला जाणार नाही याची खात्री आहे. त्यामुळे सिंह व जंगली कुत्री यांबद्दलची कथा कोठे तरी सुविचारासारखी नक्कीच असणार; मात्र हा जंगली दाखला देखील 'बंच ऑफ थॉट्स'मधील गोळवलकरांच्या विचारांसारखा परिस्थितीजन्य असू शकतो असे डॉ. भागवत आपल्यास सांगणार नाहीत. कारण जेवढे जीर्ण तेवढे सनातन ही त्यांच्या परिवाराची श्रद्धा आहे. ज्यांना लोकशाही नामंजूर असते ते अशी राजा, जंगल, कुत्री, सत्ता यांची उदाहरणे देऊन आपली हुकूमशाहीवरची भक्ती उजागर करीत असतात. लोकशाहीत राहून हे शत्रू, युद्ध, धर्म वगैरेची भाषा करीत असतात. मग सिंह कोण असेल, कुत्री कोणाला ते उद्देशून म्हणाले असतील, या उपमांचा अर्थ काय? सिंह म्हणजे पाकिस्तान व अन्य देश की, राहुल की मुस्लिम की काँग्रेस? आपले तर डोकेच चालत नाही बुवा. चार कुत्री म्हणजे नीरव मोदी, विजय मल्ल्या, मेहुल चोक्सी, ललित मोदी असे डॉ. भागवतांना म्हणायचे आहे का? नायडू-पटनायक-नीतिशकुमार-केसीआर असतील का? पक्षांतर्गत मोदीविरोधक म्हणजे कोणी मंत्रिमंडळातील सहकारी असू शकतील का? अशी एखादी चौकडी तयार झाली आहे काय? टीबी-मलेरिया-कावीळ-एड्स असे चार रोग तर नाहीत ना? महागाई-चलनवाढ-बेकारी-कुपोषण असतील काय? सिंह म्हणजे खुद्द संघ असेल का? चार शत्रू म्हणजे स्वातंत्र्य-समता-बंधुता-न्याय हे तर नसतील? ..... शाखेत जाऊन विचारायला हवे कोणाला तरी! आणखी एक संघाचे नेते नेहमी निसर्गातील दाखले व उदाहरणे देऊन लोकशाहीतील मानवी समस्यांवर तोडगे सुचवित असतात. म्हणजे आम्ही तुमचे कायदे, नियम, अटी, संविधान यांचे अडथळे जुमानत नसतो; निसर्गात जे घडते तेच खरे असते असे हे मानण्यासारखे झाले. भागवत यांनी निसर्गातील हिंस्त्र प्राण्यांच्या विश्वात काय घडते ते सांगून त्याची सांगड गाफील राहणाऱ्या नेत्याच्या राजकारणाशी घातली. तरीही लोकशाहीत तथाकथित सिंह असोत की कुत्री, त्यांना सत्ता मिळवायचा अधिकार आहे. ती गमावली जाण्याची शक्यताही असते. ती कायमची म्हणजे नैसर्गिकरीत्या त्यांच्यापाशीच राहू शकत नाही. तशी झालीच तर ती हुकूमशाही झाली. म्हणून भागवतांनी निसर्गामधील 'बळी तो कान पिळी' आणि 'जिसकी लाठी उसकी भैंस' असे




दाखले देऊन बहुसंख्याक व बाहुबली हेच सत्तेत राहायला लायक असतात असे सांगून टाकले. कधी कधी मनातील गोष्टी अशा उघड होत असतात. संघ लोकशाहीनिष्ठ कधी नव्हता व नसेल. भले मग तो तोंडी निष्ठा संविधानावर कितीही दाखवो.

***



-डॉ. अनंत राऊत

# राष्ट्र आणि माणूस समृद्ध करणारे संविधान




*भारतीय राज्यघटनेची रचनाच राष्ट्र आणि माणूस यांचा चौफेर विकास करणारी आहे. सामान्य माणसाला प्रतिष्ठा आणि देशाची मालकी देणारी आहे. कल्याणकारी राज्याला चालना देऊन विषमतेवर प्रहार करणारी आहे.*

संविधान म्हणजे देशाचा राज्यकारभार कोणत्या विचारानुसार करावा हे सांगणारे पुस्तक. भारतातील सर्व लोकांचे जीवन सुखी व समृद्ध होईल अशी समाजव्यवस्था निर्माण करणे हा आपल्या संविधानाचा हेतू आहे. या पुस्तकात देशाचा राज्यकारभार व घडण करण्यासंदर्भातील नियम दिलेले आहेत. त्या नियमांनाच देशाचे मूलभूत कायदे असे म्हणतात. आपल्या संविधानातील नियमांच्या मुळाशी भारतातील सर्व नागरिकांचा सर्व अंगांनी विकास घडवून आणण्याचे तत्त्वज्ञान आहे. हे तत्त्वज्ञान सकल जनकल्याणकारी आहे. इहवादी व मानवतावादी आहे. संविधानाच्या तत्त्वज्ञानाला माणसा-माणसातील भेदाभेद मान्य नाही. हे तत्त्वज्ञान भारतात जन्माला आलेल्या सर्व नागरिकांना समान मानते. इथल्या सर्व नागरिकांच्या मेंदूची व मनगटाची शक्ती विकसित करू पाहते. भारतीय संविधान इथल्या लोकांच्या मनातील परस्परांबद्दलची द्वेषभावना नष्ट करून सर्वांच्या मनामध्ये एकमेकांबद्दलची प्रेमभावना रुजवू इच्छिते.

आपल्या संविधानातील काही महत्त्वपूर्ण घटकांचाच आपण इथे विचार करणार आहोत. आपल्या संविधानाचे प्रास्ताविक फार महत्त्वाचे आहे. या प्रास्ताविकालाच 'उद्देशिका' असेही म्हणतात. जगात उदयाला आलेल्या मानवी कल्याणाच्या तत्त्वज्ञानांचा अर्क म्हणजे 'उद्देशिका' आहे. तिच्यातून नवा प्रगत असा भारत घडवण्याचा ध्येयवाद प्रकट होतो. भारतामधील जुनी विषमता, भेदाभेद, द्वेष व शोषणावर आधारलेली समाजव्यवस्था नाहीशी करून स्वतंत्रता, समानता, न्याय, प्रेम, मैत्री, बंधुता एकजीवता या मूल्यांवर आधारलेला नवा भारत घडवणे हा संविधानाचा उद्देश आहे. संविधान माणूसकेंद्री आहे. देशातील सर्व माणसांच्या विकासाला व आनंदमयतेला ते सर्वाधिक महत्त्व देते. भारताचे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडवणे, देशातील जनतेला सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय मिळवून देणे, विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा व उपासना

यांचे स्वातंत्र्य देणे, दर्जाची व संधीची समानता प्राप्त करून देणे, भारतातील प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा वाढवणे, राष्ट्राच्या एकतेचे व एकात्मतेचे आश्वासन देणारी बंधुता वाढवणे हा संकल्प उद्देशिकेत आहे. कल्याणकारी मूल्यांवर आधारलेले नवे राष्ट्र घडवण्याचा हा निश्चय करून २६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपल्या संविधान निर्मात्यांनी हे संविधान स्वतःच स्वतः ला अर्पण केले. म्हणजेच भारतीयांनी स्वतः निर्माण केलेले संविधान स्वतःला अर्पण केलेले आहे. त्यामुळे संविधान सर्व भारतीयांचे आहे.

मूलभूत अधिकार ही संविधानाने दिलेली सर्वांत महत्त्वाची देणगी आहे. मूलभूत अधिकारांमुळे भारतातील सर्वसामान्य माणसांच्या जीवनामध्ये कल्याणकारी बदल होऊ लागले. संविधानाच्या तिसऱ्या भागातील अनुच्छेद १२ ते ३५ मध्ये मूलभूत अधिकारांचा समावेश केलेला आहे. समानतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, शोषणाविरुद्धचा अधिकार, धर्म स्वातंत्र्याचा अधिकार, सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार, सांविधानिक उपाय योजण्याचा अधिकार हे संविधानाने दिलेले महत्त्वपूर्ण असे अधिकार आहेत. यातील काही अधिकारांचे थोडे स्पष्टीकरण करू. संविधानाचा पंधरावा अनुच्छेद म्हणतो की, 'राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे भेदभाव करणार नाही'. माणसा-माणसांमध्ये जात, धर्म, लिंगानुसार भेदाभेद करण्याची आपल्या देशामध्ये अत्यंत क्रूर स्वरूपाची चाल होती. भेदाभेद करणाऱ्या चालीमुळे भारतातील बहुसंख्य लोकांचे फार मोठे नुकसान झालेले आहे. इतिहासकाळात भेदाभेदी प्रवृत्तीमुळेच भारतीय लोकांच्या मेंदूचा व मनगटाचा विकास मुक्तपणाने होऊ शकलेला नाही. देशातील संपूर्ण जनतेच्या मेंदू व मनगटातील शक्तीचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होत नसतो. इथून पुढे तरी देशाचा विकास थांबू नये म्हणून संविधानाने सर्वांना समानतेचा मूलभूत अधिकार दिला. भारतातील जे जे लोक पूर्वीच्या काळात जात, वंश, लिंगभेदाचे बळी ठरलेले आहेत अशा लोकांना विकासाची विशेष संधी देण्यासाठी संविधानाने वेगळी तरतूद करण्यास सांगितले आहे. सरकारी नोकऱ्यांमध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांचे त्यांच्या संख्येनुसार योग्य ते प्रतिनिधित्व असावे म्हणून संविधानाने त्यांच्यासाठी आरक्षणाची तरतूद करण्यास सांगितले आहे. ही तरतूद समान संधीसाठी विशेष संधी देणारी आहे.



अभिव्यक्ती, शांततेने एकत्र जमणे, संघटना बनवणे, सर्वत्र संचार करणे, कोणत्याही भागात निवास करणे, जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य.... संविधानाने दिलेले हे स्वातंत्र्याचे अधिकार महत्त्वाचेच आहेत; परंतु व्यवसाय स्वातंत्र्याचा अधिकार अत्यंत क्रांतिकारी स्वरूपाचा आहे. विशिष्ट व्यवसायात पिढ्यान्‌पिढ्या लोकांना अडकून ठेवणारी जातिव्यवस्था या अधिकाराने निरर्थक ठरवली. प्रतिष्ठित मानल्या गेलेल्या व्यवसायात पदार्पण करण्याची संधी कनिष्ठ स्तरावरील जातसमूहांना मिळू लागली. म्हणजेच पिढ्यान्‌पिढ्या शेतीमध्ये खपणारे कुणबी, मेंढ्या पाळणारे धनगर, मेलेली गुरे ओढून टाकणारे व सांगावा घेऊन जाणारे पूर्वीचे महार, केकताडाच्या दोऱ्या व फडे बनवणारे मातंग, चामड्याचे जोडे, चप्पला इत्यादी बनवणारे चांभार, लाकडाची अवजारे करणारे सुतार, लोखंडाची अवजारे बनवणारे लोहार, कपडे धुणारे परीट, मडकी बनवणारे कुंभार, भांडी दुरुस्त करणारे तांबटकरी, कणगी बनवून देणारे कैकाडी, दगडाच्या वस्तू बनवून देणारे वडार, सर्व प्रकारचे भटके, आदिवासी अशा अनेकविध समूहातील हलक्या व्यवसायात गुंतवलेल्या लोकांना फक्त ब्राह्मण वर्गासाठी राखून ठेवलेल्या ज्ञानदानाच्या व्यवसायातदेखील येण्याची संधी मिळू लागली आणि इथूनच भारतातील सामाजिक परिवर्तनाला सुरुवात झाली. संविधानाने दिलेला व्यवसाय स्वातंत्र्याचा अधिकार भारतामधील कोट्यवधी बहुजनांच्या जीवनाचे सोने करणारा आहे.

संविधानाच्या चौथ्या भागात सरकारने आपला राज्यकारभार कशाप्रकारे करावा याबद्दलचे काही नियम दिलेले आहेत. भारतातील प्रत्येक नागरिकाच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण या मूलभूत गरजा सन्मानाने भागल्या पाहिजेत. देशात कुणालाही अन्न नाही म्हणून उपाशी राहावे लागू नये. वस्त्र नाही म्हणून उघडे नागडे राहावे लागू नये. निवारा नाही म्हणून फूटपाथवर, फाटक्या झोपडीत किंवा पालात राहावे लागू नये. औषधपाण्याला पैसा नाही म्हणून मरणाला सामोरे जावे लागू नये. शिक्षणासाठी पैसा नाही म्हणून देशातील कोणत्याही बालक-बालिकेला शाळेच्या बाहेरच भटकावे लागू नये अशी स्थिती निर्माण करणे ही सरकारची जबाबदारी असल्याचे संविधानाने सांगितले आहे. सरकारने कल्याणकारी राज्यव्यवस्था राबवली पाहिजे असे संविधानाचा हा भाग सांगतो. अनुच्छेद ३६ ते ५१ मध्ये समाविष्ट असलेली राज्य धोरणाची ही नीतिनिदेशक तत्त्वे फार महत्त्वाची आहेत. अनुच्छेद ३८(१) मध्ये संविधान सरकारला असा निर्देश देते की, 'ज्या समाजव्यवस्थेमध्ये सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय हा राष्ट्रीय जीवनाच्या सर्व संस्थांना प्राणभूत होईल अशी समाजव्यवस्था होईल तितक्या परिणामकारक रीतीने प्राप्त करून देऊन व तिचे संरक्षण करून लोककल्याणाचे संवर्धन करण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील'. सरकारने भारतीय नागरिकांमध्ये उत्पन्नाच्या बाबतीत असलेली विषमता किमान पातळीवर आणण्यासाठी झटून प्रयत्न करावा. दर्जा, सुविधा व संधी यांच्याबाबतीत असलेली विषमता नाहीशी करण्यासाठी प्रयत्न करावा, असेदेखील ही तत्त्वे सांगतात. धनदौलतीचा व साधनांचा जनसामान्यांना अपायकारक होईल अशा प्रकारे एकाच ठिकाणी संचय होऊ देऊ नये हा एक महत्त्वपूर्ण निर्देश संविधानाने सरकारला दिलेला आहे. स्त्री-पुरुषांना समान कामासाठी समान वेतन द्यावे. ग्रामपंचायतींची सुसूत्र व्यवस्था लावावी. बेकार, वृद्ध, आजारी, विकलांग यांना सरकारी सहाय्य द्यावे. कामाच्या बाबतीत न्याय्य, मानवोचित परिस्थिती उपलब्ध करून द्यावी. मजुरांना आनंदमय जीवन जगता येईल असे निर्वाह वेतन द्यावे. उद्योगधंद्यांच्या व्यवस्थापनात कामगारांना सहभागी करून घ्यावे. सर्व नागरिकांसाठी समान नागरी कायदा करावा. बालकांना मोफत शिक्षण द्यावे. अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती आणि इतर दुर्बल घटकांचे शैक्षणिक आणि आर्थिक हितसंवर्धन करावे. जनतेचे पोषणमान व राहणीमान उंचवावे, सार्वजनिक आरोग्य सुधारावे. कृषी व पशुसंवर्धन याची सुसूत्र व्यवस्था लावावी. पर्यावरणाचे संरक्षण करून त्यात सुधारणा करावी. अरण्ये व वन्यजीव यांचे संरक्षण करावे. राष्ट्रीय स्मारके व वास्तूंचे संरक्षण करावे. न्याय अंगाची शासनापासून फारकत करावी. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन करावे. भारतीय संविधानाने अशा प्रकारचे अनेक निर्देश शासनकर्त्यांना दिलेले आहेत. हे सारेच निर्देश भारतात कल्याणकारी राज्यव्यवस्था प्रस्थापित करण्याचा आग्रह धरणारे आहेत. देशातील सामान्य नागरिकाला केंद्रस्थानी ठेवून सर्व प्रकारची धोरणे राबवली पाहिजेत असे सांगणारे आहेत. परंतु वर्तमान काळातील शासन यंत्रणेत लोकप्रतिनिधी म्हणून गेलेले लोक भांडवलदारांच्या हातातील बाहुले बनलेले आहेत. त्यामुळे हे लोक मोठ्या प्रमाणात भांडवलदारधार्जिणी धोरणे राबवत आहेत. कल्याणकारी राज्याची संकल्पना आज जवळजवळ मोडीत काढलेली आहे. एकीकडे मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत अधिकार द्यायचा आणि त्याचवेळी शिक्षणाच्या खासगीकरणाला मुक्त वाव देऊन सकस शिक्षणाच्या संधीमध्ये प्रचंड मोठी विषमता निर्माण

करायची. भरमसाट पैसे देऊ शकणाऱ्या धनिकांसाठी उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्यायच्या आणि ज्यांच्याकडे पैसा नाही त्यांना निकृष्ट दर्जाच्या सरकारी आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्यायच्या. सरकारी आरोग्य केंद्रांमध्ये गरीब घरातील आजारी लोकांची प्रचंड हेळसांड करून त्यांना तसेच मरू द्यायचे. अशी अनेक प्रकारची भेदाभेदी प्रवृत्ती आज मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसून येते. बहुतांश क्षेत्रांचे खासगीकरण करून आरक्षणाचे तत्त्व आज निरर्थक केलेले दिसते. भारतीय संविधानातील तत्त्वांच्या संदर्भात देशातील जनता जोपर्यंत मोठ्या प्रमाणात जागृत केली जात नाही तोपर्यंत राज्य धोरणांच्या नीती निदेशक तत्त्वांची प्रभावीपणाने अंमलबजावणी करण्याचा आग्रह धरणारे लोक समोर येणार नाहीत.

३ जानेवारी १९७७ रोजी ४२ व्या संविधान दुरुस्तीद्वारे संविधानामध्ये नव्याने समाविष्ट केलेला 'मूलभूत कर्तव्ये' ५१(क) हा अनुच्छेद फार महत्त्वाचा आहे. हा अनुच्छेद भारतीय लोकांच्या मनावर संविधानिक राष्ट्रनिष्ठेचे मूल्यसंस्कार करणारा आहे. संविधानाचे पालन करणे हे भारतीय नागरिकांचे मूलभूत कर्तव्य आहे. संविधान काय व कसे आहे हे माहीत झाल्याशिवाय लोक संविधानाचे पालन तरी कसे करतील? भारतात शासनकर्त्यांनीच संवि शिकवण देणारी व्यापक अशी यंत्रणा करावयास हवी होती; परंतु त्यांनी केलेली नाही. सामाजिक संस्था व संघटनांनीदेखील संविधानाचे संस्कार करण्याची कुठलीही यंत्रणा उभी केलेली नाही. परंपरागत स्वरूपाचे धार्मिक संस्कार करणाऱ्या यंत्रणा मात्र आपल्या देशामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. त्यामुळे आपले लोकमन संविधाननिष्ठ न बनता जात, धर्म व पुराणपरंपरानिष्ठ बनलेले आहे. संविधान निष्ठेशिवाय खरी राष्ट्रनिष्ठा वाढत नाही आणि लोकांमध्ये भविष्यवेधी दृष्टीचा विकासही होऊ शकत नाही. म्हणून आज भारताला संविधान साक्षर करणे फार आवश्यक आहे. संविधानाचे आदर्श, त्याने निर्माण केलेल्या संस्था, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांचा आदर करणे हेदेखील भारतीय नागरिकांचे मूलभूत कर्तव्य आहे. ज्यांनी आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्याला स्फूर्ती दिली अशा आदर्शांची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे, भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व त्यांचे संरक्षण करणे, आवाहन केले जाईल तेव्हा देशाचे संरक्षण करून राष्ट्रीय सेवा बजावणे, धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे; स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे, आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे मोल जाणून तो जतन करणे; अरण्ये, सरोवरे, नद्या व वन्यजीवसृष्टी या नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून सुधारणा करणे आणि सजीव प्राण्यांबाबत दयाबुद्धी बाळगणे, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे, राष्ट्र सतत उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशाप्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे, ६ ते १४ वर्षे वयापर्यंतच्या बालकांना आई-वडिलांनी किंवा पालक यांनी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे ही भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्ये असल्याचे संविधानात नमूद केलेले आहे. भारतीय नागरिक आजदेखील आपली विशिष्ट अशी जातधर्मीय कर्तव्ये निष्ठेने बजावतात; परंतु संविधानाने सांगितलेली ही राष्ट्रीय कर्तव्ये मात्र त्यांच्या गावीच नसतात. ही आपली भारतीय नागरिक म्हणून करावयाची मूलभूत कर्तव्ये आहेत याची वारंवार जाणीव करून देणारी यंत्रणा आपल्या देशात राबवावी लागणार आहे.



संविधानाची शपथ हा फार महत्त्वाचा भाग आहे. निवडणुकीस उभे राहत असताना व निवडून आल्यानंतर सत्तेच्या खुर्चीवर बसत असताना लोकप्रतिनिधींना संविधानाची शपथ घेणे बंधनकारक असते. ही शपथ सत्तारूढ होणाऱ्या लोकप्रतिनिधीला त्याच्या कर्तव्याची जाणीव देणारी व त्याच्या मनावर मूलभूत असे मूल्यसंस्कार करणारी आहे.

***

मुलाखत



# गांधी-आंबेडकरांची दुश्मनी नव्हतीच

महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर दोघेही प्रखर विचारांचे महान नेते होते. अशा दोन व्यक्ती समोरासमोर येतात तेव्हा टकराव होतच असतो. पण त्याला मतभेद म्हटलं पाहिजे, दुश्मनी नव्हे. दोघांच्याही कार्यकर्त्यांनी ही गोष्ट सांगायचं धाडस केलं नाही. बाबासाहेब केवळ आपल्या जातीचं हित पाहणारे नव्हते तर तेही प्रखर राष्ट्रवादी होते हेही सांगायला हवं. तुषार गांधी यांच्या परखड मुलाखतीचा शेवटचा भाग...

**प्रश्न : आज भारतासमोर दिसणारे प्रमुख प्रश्न कोणते?**

– भारतीय जनतेची खूप मोठी दिशाभूल केली जात आहे. तरुणांना रोजगार नाही. त्याच्या महत्त्वाच्या प्रश्नांवरून त्यांचे लक्ष वळवण्यासाठी त्यांना राजकारणाकडे वळवलं जात आहे. त्यांच्या धार्मिक भावना चेतवल्या जात आहेत. त्यांना चुकीच्या क्षेत्रात ढकललं जात आहे. गुंतवलं जात आहे. फसवलं जात आहे. त्यांना याची जाणीव झाली तर ते याचा राग दुसरीकडे काढतील, जो देशासाठी घातक आहे. त्यांचे प्रश्न मार्गी लावणे हाच एक पर्याय आहे. तरुणांचे प्रश्न, त्यांच्या समस्या याच देशासमोर प्रमुख समस्या आहेत.


**प्रश्न : हिंदू राष्ट्राच्या निर्मितीसाठीच्या चर्चेकडे तुम्ही कसं पाहता?**

– फार वर्षांपूर्वीपासूनचा प्रयत्न आहे, अगदी स्वातंत्र्यापूर्वी. त्यांची हिंदू राष्ट्र निर्माण करायची मनीषा होती; पण स्वातंत्र्य ज्या पद्धतीने आपल्याला भेटले त्यामुळे त्यांचा हिंदू राष्ट्राच्या स्थापनेचा बेत निष्फळ झाला. स्वातंत्र्यानंतर तीन दशकं आपल्याला एक प्रखर नेतृत्व भेटलं त्यामुळे हिंदू राष्ट्राला माघार घ्यावी लागली. म्हणून मग त्यांनी खाली राहून या राष्ट्राला पोकळ बनवण्याचा प्रयत्न चालू केला. त्यांना १९७० नंतर प्रतिसाद मिळाला. एकप्रकारे सहानुभूती भेटली. मग त्यांनी लोकांमध्ये यायला सुरुवात केली. ९० नंतर तर त्यांना फार मोठा प्रतिसाद भेटला. पायरी पायरीने हिंदू राष्ट्र निर्माण करण्याची विचारधारा प्रस्थापित करायला सुरुवात केली. गुजरातसह ज्या ठिकाणी बीजेपीचे सरकार आहे तिथं त्यांनी ती प्रस्थापित केली.

**प्रश्न : आजच्या सरकारच्याही वर्तनातून हे दिसून येते का?**

– हो आज अन ऑफिशिअल पॉलिसीजच्या माध्यमातून त्यांचा मनसुबा ते राबवत आहेत. गोरक्षाच्या नावावर असेल, गोसेनेच्या नावावर असेल, गायींच्या नावावर असेल, बीफच्या नावावर असेल हे सगळ्यांमधून त्यांनी सुरू केलं आहे. सायंटिफिकली जे मेजॉरिटीला भावणारं आणि मायनॉरिटीला चॅलेंज वाटणारं आणि मग मायनॉरिटीकडून रिॲक्शन होणार अशी त्यांनी जास्तीत जास्त उग्र पावले टाकलेली आहेत. या सगळ्यांच्या मागे एक छुपा अजेंडा आहे. त्यांचा बेत हिंदू राष्ट्र बनवण्याचा आहे. हिंदू राष्ट्र म्हणजे हिंदू धर्म. तो सहिष्णू आहे. त्याचं





राष्ट्र जे बापूंना पण मान्य होतं. कारण बापूंचा हिंदू धर्म जो होता तो सहिष्णू होता. तो समभावी होता आणि यांचे हिंदू राष्ट्र हे असहिष्णू आहे. ते जातीयवादी आहे, वर्चस्ववादी आहे. म्हणजे त्याचं जे हिंदू राष्ट्र आहे ते हिंदू राष्ट्र नाहीच. ते कॉस्ट डॉमिनन्सच हिंदू राष्ट्र त्यांना आणायचंय. कास्ट सिस्टिमला लिगलाईज करायचं आहे.

**प्रश्न : आज गांधीजींचं अपहरण केलं आहे असं वाटतं का?**

– बघा. गांधीजींच्या प्रतिमेचे अपहरण कोणीही करू शकतं. त्यावर कोणाचं बंधन नाही. गांधीजींच्या विचाराचे ते आचरण करत नाहीत. ते फक्त सोंग करतात हे सगळ्यांना कळतं. आज परिस्थिती अशी आहे की, लोकांना सोंगाचं फार कौतुक झालं आहे. जे दहामुखी रावण सांगतात तसे १० मुखवटे घेऊन सगळेच फिरत असतात. जेव्हा गरज पडेल तेव्हा तो मुखवटा धारण करून समाजापुढे यायचं आणि लोकांना हे कळत असूनसुद्धा त्याला बळी पडण्याचा कमकुवकपणा आला आहे. परिणाम हे सोंगाडे सगळे नेते बनून बसलेत. कधी स्वत:ला सेक्युलर म्हणायचं आणि कधी स्वत:ला जानवेधारी म्हणायचं. विरोधी पक्षातसुद्धा सोंगाडे आले आहेत. आपण फक्त जे सत्ताधारी आहोत त्यांचंच बोलतो. राहुल गांधींना नाही का आपण सेक्युलर आहेत हे सांगावं लागतं? मी देवळात गेलो, मी मंदिरात गेलो, मी जानवेधारी आहे हे का बोलावं लागतं? म्हणजे तुम्हाला याची स्वत:ला गरज नाहीये; पण स्वत:च्या सत्तालोभासाठी त्याची गरज पडलेली आहे असं जाणवतं.

**प्रश्न : विरोधी पक्षवाले पण सोंगाडे आहेत का?**

– हे बघा. सध्याच्या सरकारला पॉझिटिव्ह वोट मिळाले नाहीत. हे सरकार सत्तेवर निगेटिव्ह वोटवर आलं आहे. माझ्याकडे पर्याय राहिला नाही म्हणून मला त्यांना मत द्यावं लागलं. वाईट म्हणूनसुद्धा मला हे वाईट लोक मान्य करावेसे वाटले. मी त्यांना वोट दिलं. माझ्याकडे दुसरा चांगला पर्याय असता तर मी त्यांना कधीच वोट दिलं नसतं. हा निगेटिव्ह वोटिंगचा परिणाम आपल्याला भोगावा लागत आहे. त्याची जबाबदारी जे लोक विरोधी पक्षामध्ये आहेत त्यांच्यावरच आहे की, त्यांनीच मला एवढं निराश करून ठेवलं आहे. ते पण सोंगाडे आहेत.

**प्रश्न : आता राहुल गांधींच्या हातात काँग्रेस पक्षाची धुरा आहे. राहुल गांधींच्या हातून काँग्रेसचं भविष्य बदलेल?**

– एका व्यक्तीवर जर ही लोकशाही अवलंबून राहिली तर ती लोकशाही कधीच राहणार नाही. ही लोकशाही सामूहिक नेतृत्व म्हणून प्रस्थापित झाली होती. आणि हे सामूहिक नेतृत्व असं नव्हतं की मी उभा राहिलो तर बाकीच्यांनी गप्प बसायचं. पूर्वी काँग्रेस वर्किंग कमिटीमध्ये सर्वांचा आवाज तेवढाच प्रखर असायचा. आज तो नाहीये. आज ही व्यक्तिवादी बनली आहे. पूर्ण काँग्रेस पार्टी आज फक्त राहुलवरच अवलंबून आहे. आता राहुल गांधी आमचा नेता झाला. आता आम्ही जिंकू. मग बाकीच्यांचे

काही कर्तव्य आहे की नाही? तुम्ही कामाची जबाबदारी घेतली आहे का? तुम्हाला जर सत्ता हवी असेल तर मग फक्त काय बसून राहाल! तुम्ही जिंकाल पण राहुलमुळेच आणि हरणार पण राहुलच्याच कारणामुळे. म्हणजे हरलात तर त्याचा दोष आणि जिंकलात तर त्याचा तुरा राहुलच्या डोक्यावर. ही काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षात सर्वांत मोठी कमजोरी आहे.

**प्रश्न : गांधीजी आणि बाबासाहेबांच्या संबंधांकडे तुम्ही कसे पाहता?**

– दोन प्रखर व्यक्तिमत्त्व जेव्हा समोर असतात तेव्हा मतभेद होणं फार स्वाभाविक आहे. ते दोन्ही प्रखरपणे उभे राहिलेले असतात. बापूंसाठी आणि बाबासाहेबांसाठी ही राष्ट्राची संकल्पना महत्त्वाची होतीच; पण त्याच्यात त्यांच्या जातीवर झालेले जे अन्याय होते, जुलूम होते त्याची पण काळजी आणि चिंता बाबासाहेबांना होती. ते स्वाभाविक आहे. त्यांच्या विचारांना बापूंनी पण समजलं होतं. पण आज जी ओढ लागलेली आहे बाबासाहेब आणि गांधींच्या द्वेषाची ती त्यांच्या भक्तांच्या स्टेट्समुळे आहे. माझा नेता तुमच्या नेत्यापेक्षा श्रेष्ठ कसा हे भक्त सांगत आहेत. यात गांधीवादी आणि आंबेडकरवादी पण पुढे आहेत. ते लोक रॉकेल टाकत राहतात, त्यामुळे हा द्वेष इतका वाढलेला दिसतो. खरं बघायला गेलं तर त्यांचा मतभेद जो सांगितला जातो तो पुणे कराराचा. पुणे कराराच्या आडून बापूंनी छळ केला आणि आंबेडकरांना त्यांनी फसवलं. आंबेडकर तेवढे भोळेभाबडे नव्हते की ते फसतील! त्यांनी त्याबाबत खूप विचारपूर्वक निर्णय घेतला आहे. त्यांना गांधीजी जिंको की मरो याची काहीही गरज राहिली नसती, पण तेव्हा त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेम इतकं होतं की, त्यांनी गांधींचा जीव वाचवला. त्यांना कळलं की, इंग्रज आम्हाला विभागत आहेत. त्यांनी हा विचार केला की, जातीसाठी माझी जी जिद्द आहे ती स्वातंत्र्यानंतर पण मी मिळवू शकेन. पण आता जर मी विभाजित झालो आणि मी वेगळा झालो तर स्वातंत्र्य धोक्यात येणार याची कल्पना त्यांना होती म्हणून त्यांनी देशहित अंतिम मानलं. द्वेष करणाऱ्यांना हे समजलं पाहिजे. त्यांना स्वत:चं नेतृत्व टिकवून ठेवायचं आहे. त्यांनी हा द्वेष जास्त पसरवून चालणार नाही. इंग्रजांनी जे डिवायडेड ॲण्ड रूल हे तत्त्व राबवले ते काहीअंशी आजही आपल्यात आहे. आता ते दुरुस्त केलं पाहिजे. द्वेष दुरुस्त होणार कारण तो द्वेष अस्वाभाविक आहे. तो जास्त काळ टिकू शकत नाही. गांधीवादी आणि आंबेडकरवादी एक होतील असे वाटतं.

**प्रश्न : द्वेष दुरुस्त होण्यासाठी नव्यानं काही रचना निर्माण केली पाहिजे?**

– काय झालंय आंबेडकरवादी–गांधीवादीही यावर जास्त बोलत नाहीत. कारण त्यांना स्वत:चं नेतृत्व टिकवून ठेवायचंय. गांधीवादी बोलत नाहीत कारण त्यांना वाटतं की, कुठं त्यांना छेडायचं. हे सत्य आहे, हे निर्भीडपणे पुढे येऊन सांगावं लागेल की, तो मतभेद होता पण दुश्मनी नव्हती. जर आंबेडकरांना बापूंचा एवढा द्वेष होता तर मग त्यांनी मारेकरी का नाही पाठवले? त्यांच्यावर तर अन्याय झाला होता असं आंबेडकरवादी लोक सांगतात. मग तुमच्यातून मारेकरी का नाही निघाला? कारण तुमचं त्यावेळचं जे नेतृत्व होतं त्याला माहीत होतं की, हे सैद्धांतिक मतभेद आहेत, ही दुश्मनी नाहीये. माणसांनी बोललं पाहिजे. हे सत्य बोलावं लागेल.

**प्रश्न : गांधीजींना समजून घेताना आपण आज काय काळजी घेतली पाहिजे?**


– त्यांच्या विचारांना नीट समजून घेतलं पाहिजे. आजच्या काळासाठी ते कसे सुसंगत होऊ शकतात हे जाणून घेतले पाहिजे. बापूंचे मार्गदर्शक कोणी होऊ शकत नाहीत. बापूंचे शिक्षक कोणी होऊ शकत नाहीत. बापूंना समजावून घेण्याचा प्रयत्न आपण स्वत: करायला पाहिजे. बापूंची भक्ती महत्त्वाची नाही. बापूंची समजूत, त्यांचे विचार महत्त्वाचे आहेत. व्यक्तीची मूर्तीपूजा नको म्हणून मी त्यांना कधी महात्मा गांधी म्हणत नाही. महात्मा म्हटलं की ते आपल्यापेक्षा एका उंच स्थानावर पोहोचून जातात. आपण कधीच त्या ठिकाणी पोहोचू शकणार नाही. यासाठी मी नेहमी हे सांगतो – 'महात्मा को भूलो और बापू को पहचानो।' बापू समजून घेण्यासाठी त्यांचा विचार समजून घेतला पाहिजे.

**(मुलाखत : चेतन शिंदे)**


***

## वाचकांसाठी स्पर्धा

**लंडन येथे १२ नोव्हेंबर १९३० ते २९ जानेवारी १९३१ दरम
देशभरातील प्रतिनिधी उपस्थित होते. त्यात डॉ. बाबासाहे
दुर्मिळ व्यंगचित्र आम्ही प्रसिद्ध करीत असून, त्यामध्ये
आहे. व्यंगचित्रात बाबासाहेबांचा क्रमांक कोणता, हे
या व्हॉट्सअॅप क्रमांकावर संपूर्ण नाव, पत्ता व बँक खा
पहिल्या पाच स्पर्धकांना प्रत्येकी रोख एक हजार रुप
'द पीपल्स पोस्ट'चा अंक पुढील सहा महिने मोफत दिल**



्यान पहिली गोलमेज परिषद पार पडली. या परिषदेमध्ये
हेब आंबेडकर यांचाही समावेश होता. या परिषदेचे अत्यंत
सहभागी झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीला क्रमांक दिलेला
ओळखून तुम्हाला ९८८११४६००५ (नागसेन बागडे)
ते क्रमांकासह दि. २५ ऑक्टोबरपर्यंत पाठवायचे आहे.
ये बक्षीस म्हणून दिले जाईल. तर इतर २० स्पर्धकांना
ा जाईल.







भन्ते सदानंद महास्थवीर
अध्यक्ष, अ. भा. भिक्खू संघ

# धम्माने आत्मसन्मान वाढवला

**डॉ. बाबासाहेबांनी गुलामांच्या जीवनात धम्मक्रांती घडवली, आता त्याला बासष्ट वर्षे झाली. एका क्रांतीच्या झोतात सारे गुलाम मोकळे झाले. त्यांना गुलाम करणाऱ्या देवधर्माला त्यांनी फेकून दिले. आम्ही आता गुलाम नाही. बुद्धिस्ट आहोत. स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचे पाईक आहोत असे हा समाज मोठ्या अभिमानाने सांगतो आहे; कारण त्याचा आत्मसन्मान जागा झाला आहे.**

मी १४ वर्षांचा असताना एक प्रसंग माझ्या मनात कायम राहिला तो १४ ऑक्टोबर १९५६ चा दिवस. आजही चलचित्राप्रमाणे मला तो प्रत्यक्ष दिसतोय. दीक्षाभूमीवरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्या ऐतिहासिक धर्मांतराच्या वेळेस केलेल्या आवाहनाचा एक एक शब्द मनामध्ये मी कोरून ठेवला आहे. खेड्यापाड्यांतून, शहरांतून, राज्यांतून आलेली लाखो लोकांची गर्दी डोळ्यासमोर आजही दिसतेय. आपल्या लाडक्या 'बाबासाहेबांना डोळ्यात नेहमीकरिता साठवून घेण्यासाठी, आपल्या मुक्तीचा मार्ग समजून घेण्यासाठी सकाळी लवकरच दीक्षाभूमी परिसरामध्ये मी उपस्थित होतो. ९ वाजताच बाबासाहेबांची गाडी स्टेजजवळ आली. रत्तुंच्या खांद्यावर हात ठेवून बाबासाहेब स्टेजवर आले तेव्हा लाखो लोकांनी त्यांचा केलेला जयजयकार आजही कानामध्ये घुमतो आहे'.

या ऐतिहासिक धम्मक्रांतीला ६२ वर्षे पूर्ण होत आहेत. आज मी ८० वर्षांचा आहे. तरीही अंगावर रोमांच आणणारे ते क्षण, मनामध्ये नवचैतन्य निर्माण करणारा तो दिवस जसाच्या तसाच दिसतोय. मी आज हे लिहीत आहे, ''लोकुत्तरा आंतरराष्ट्रीय भिक्खू प्रशिक्षण केंद्र'' औरंगाबाद इथे माझ्या खोलीत बसून. अतिशय भव्य स्वरूपाचे हे भारतातील पहिले भिक्खू प्रशिक्षण केंद्र, ज्येष्ठ सनदी अधिकारी, धम्माचे अतिशय विनम्र उपासक डॉ. हर्षदीप कांबळे (उद्योग विभागाचे आयुक्त) व त्यांची पत्नी रोजाना व्हनिच कांबळे यांनी बांधून अखिल भारतीय भिक्खू संघाला दान दिले

आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील प्रशिक्षण केंद्र इथे तयार झाले आहे. बाबासाहेबांच्या धम्मक्रांतीचे हे खूप मोठे फलित आहे, हे मी मानतो. १४ ऑक्टोबर १९५६ ते १४ ऑक्टोबर २०१८ या धम्मक्रांतीच्या ६०-६२ वर्षांतील ही खूप मोठी ऐतिहासिक व दूरगामी परिणाम करणारी घटना आहे असे मी समजतो.

बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञांचे पालन करणे हे फार महत्त्वाचे मानले जायचे. परंतु तथागत बुद्धांचे तत्त्वज्ञान नेमके काय याची माहिती व्हावी म्हणून मी अनेक वर्षे धम्माचा अभ्यास केला. त्यानंतर गावोगावी प्रचार-प्रसार करायला लागलो. नागपूरकडील नव्याने बुद्धिस्ट झालेल्या लोकांची आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती तेव्हा फारच नाजूक होती. तरीही आपल्या नवीन धम्माचे पालन करायला पाहिजे म्हणून कितीतरी लोकांनी आपल्या देव्हाऱ्यातल्या देवीदेवतांच्या मूर्ती गावच्या विहिरीत, तलावात फेकून दिल्या. कुठलाही माणूस असो, देवांच्या मूर्ती फेकायला मनाची खूप हिम्मत लागते. त्या वेळेस लोकांनी दाखविली. स्वतःच्या जीवनामध्ये नवीन धम्माच्या स्वागताचा निर्णय घेणे ही बाबासाहेबांच्या धम्मक्रांतीमधली पहिली सुरुवात आहे. स्वर्ग, नरक, अंधश्रद्धा, जात-पात, देवीदेवता यांपासून मुक्त होण्याचा संकल्प कुठलीही भीती, तमा न बाळगता तेव्हा लोकांनी घेतली. बुद्ध धम्माच्या नव्या अध्यायाची सुरुवात झाली. मागील ६०-६२ वर्षांच्या कालावधीमध्ये धम्मक्रांतीमुळे नेमके काय झाले, याचा आढावा घ्यायला हवा. बुद्धाची शिकवण मानवतेवर, समानतेवर, करुणेवर आधारित आहे. त्यामध्ये सामाजिक न्यायही आहे. म्हणूनच बाबासाहेबांनी स्वतः धम्म स्वीकारला तसेच आपल्या अनुयायांनासुद्धा तो स्वीकारायला सांगितला. ते स्वतःच म्हणतात की, भारतीय संविधानातील प्रस्तावनेमध्ये असलेले ''स्वातंत्र्य, समता, बंधुत्व'' हे त्यांनी बुद्धाच्या तत्त्वज्ञानापासून घेतलेले आहे. (फ्रेंच राज्यक्रांतीमधून नाही) १९५६ ला झालेल्या धर्मांतराच्या ऐतिहासिक घटनेच्या परिणामांचा आढावा घेत असताना, ज्यांनी बुद्ध धम्म स्वीकारला त्यांच्या धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक जीवनावर काय बदल झालेत, यावर विचार करणे आवश्यक आहे. तसेच इतर लोकांनाही त्या बदलाबद्दल काय वाटते हेसुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे.

दलित पँथरने स्वतःची मोठी ताकद निर्माण केली. मुंबईसुद्धा आम्ही बंद करू शकतो हे दाखवून मोठा दरारा निर्माण केला. त्यांच्यामुळे समाजाला एक प्रकारची प्रतिकार करण्याची हिम्मत आली. याचा प्रत्यय पुन्हा भीमा कोरेगाव येथे बघायला



मिळाला. १९७० ते १९९० चा काळ हा नवबुद्धिस्ट लोकांच्या सामाजिक व धार्मिक जीवनाच्या अंगाने महत्त्वाचा आहे. वर मी लिहिल्याप्रमाणे लोक एकत्रित यायला लागलेत. नवीन तरुण पिढी शिकायला लागली. जातीवरून होणाऱ्या अन्याय-अत्याचाराला आक्रमकपणे उत्तर द्यायला लागली. आम्ही बुद्धिस्ट आहोत, तुमच्यापेक्षा वेगळे आहोत असे अभिमानाने सांगायला लागली.

'जयभीम'चा नारा गावागावांमध्ये गुंजायला लागला. कालपर्यंत आमच्या हुकूमाचे ताबेदार असलेल्या शूद्रांनी आपल्या बरोबरीने वागावे हे त्यावेळेच्या सवर्ण लोकांना, ओबीसींना मान्य झाले नाही. त्यातून नवबुद्धांवर हल्ले व्हायला लागले. आपल्या देवीदेवतांना अपमानित करण्यात आल्याचे कारण त्यामध्ये सांगितले गेले. या अत्याचाराची संख्या वाढत असल्यामुळे बुद्धिस्ट तरुणांनी 'दलित पँथर' नावाची संघटना तयार केली आणि आपल्यावर होत असलेल्या हल्ल्यांना प्रतिहल्ल्यांनी उत्तरे

द्यायला लागली. हे सर्व घडत असताना औरंगाबाद इथल्या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी मागणी करण्यात आली. खरे तर बाबासाहेबांनी १९५० मध्येच नागसेनवन परिसर, औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून सर्व जाती-धर्माच्या मुलांना प्रवेश दिला. त्यामुळे भारत देशातील या थोर सुपुत्राचे नाव औरंगाबाद विद्यापीठाला न देण्याचे काही कारण नव्हते. पण राजकीय, सामाजिक आणि धार्मिकदृष्ट्या स्वतःचा फायदा करून घ्यायचा अशा संकुचित मानसिकतेमुळे काही लोकांनी याला विरोध केला. बाळासाहेब ठाकरेंसारख्या माणसाने नामांतराला विरोध केला. मराठवाड्यात दंगली घडवून आणल्या. नामांतराच्या समर्थनात लाँगमार्चसारखी आंदोलने झाली. या आंदोलनांमध्ये महार, मांग, व्हीजेएनटी, चर्मकार इत्यादी जातींच्या लोकांनीसुद्धा महारांच्या, बुद्धिस्ट लोकांच्या खांद्याला खांदा लावून संघर्ष केला. बरेच जण जेलमध्ये गेले. पुढे विद्यापीठाचा नामविस्तार झाला; पण नामांतर आंदोलनामध्ये जी वेगवेगळ्या जातींची ऐकी झाली होती ती मात्र आपण टिकवू शकलो नाही, ही फार दुःखाची गोष्ट आहे.

'रिडल्स इन हिंदूझम' या बाबासाहेबांनी लिहिलेल्या पुस्तकाविरुद्ध १९९२-९३ च्या दरम्यान मुंबई येथे फार मोठी दंगल झाली. शिवसेनेने यामध्ये परत पुढाकार घेतला. या दंगलीला 'हिंदू विरुद्ध बुद्धिस्ट' असे स्वरूप प्राप्त झाले. यामुळे नवबुद्धिस्ट आणि सवर्ण व इतर समाजामध्ये मोठी दरी निर्माण करण्यात आली. ज्याचा फार मोठा परिणाम सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रामध्ये दिसून आला. बाबरी मशीद पाडून 'गर्व से कहो हम हिंदू है' म्हणून धर्मांधता वाढविण्यात आली. त्यामुळेही बुद्धिस्ट लोकांना धर्माच्या नावावर एकटे पाडण्यात आले. आताही याच गोष्टीचा वापर करण्यात येत आहे, हे स्पष्ट दिसतेय.


या कालावधीमध्ये सामाजिक आंदोलने खूप झाली. धम्माच्या वाढीसाठी मात्र म्हणावे तेवढे प्रयत्न झाले नाहीत. गावागावांमध्ये पसरलेला धम्म वैचारिकदृष्ट्या वाढू शकला नाही. याच कालावधीमध्ये नवशिक्षित असलेल्या बुद्ध विचारवंतांचा, साहित्यिकांचा वर्ग नव्या जोमानं पुढे आला. प्रचलित व्यवस्थेच्या विरुद्ध लिहायला लागला. यामध्ये प्रसिद्ध साहित्यिक रावसाहेब कसबे, बाबूराव बागूल, नामदेव ढसाळ, दया पवार, ज. वि. पवार, राजा ढाले इत्यादी नावे घेता येतील. फार आक्रमकपणे इथल्या व्यवस्थेवर त्यांनी प्रहार केले आणि हजारो तरुणांना एक नवीन प्रेरणा दिली, मोठे वैचारिक बळ दिले. ''सांगा धनाचा साठा आणि आमचा वाटा कुठाय हो'' असे भीमशाहीर वामनदादा कर्डक गावागावांमध्ये जाऊन विचारू लागले. चेतना निर्माण करू लागले. बाबासाहेबांचे विचार पसरवू लागले. बुद्धांवर गाणे लिहिण्यास परत सुरुवात झाली. समाजाने एकत्र यायला पाहिजे, ही भावना फार जोर धरू लागली. धम्माच्या नावावर लोक परत एकत्र यायला लागतील. परत नवीन विहारे बांधायला सुरुवात झाली. नवसाहित्यांमध्ये बुद्धाचा विचार प्रकर्षाने यायला लागला. आपल्याला बाबासाहेब आणि बुद्ध नव्याने समजून घ्यायला पाहिजे ही भावना नवशिक्षितांमध्ये निर्माण झाली. शिक्षणामुळे आणि आरक्षणामुळे समाजामध्ये खूप सारे डॉक्टर, इंजिनिअर, वकील तयार झाले. सरकारी नोकरदार तयार झाले. हे सर्व आपापल्या परीने धम्म वाढीसाठी प्रयत्न करायला लागले आहेत. आपलेच काही जण आय.ए.एस., आय.पी.एस. झाले. जिल्हाधिकारी झाले. लाल दिव्याच्या गाडीत फिरू लागले. हा एक मोठा बदल शैक्षणिक आणि धम्मक्रांतीमुळे दिसून आला आणि समाजाची स्वतःकडे बघायची मानसिकता बदलू लागली. स्वतःबद्दलचा आत्मविश्वास वाढू लागला. आपण कुणापेक्षाही कमी नाही हा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये आणि त्यांच्या मुलांमध्ये रुजून गेला. नवीन पिढी परदेशात जायचे स्वप्न बघायला लागली. धम्मक्रांतीमुळे एक नवीन आत्मविश्वास घेऊन ही पिढी पुढे यायला लागली. हा फार मोठा दूरगामी परिणाम करणारा दुसरा टप्पा समजायला काही हरकत नाही.

नवशिक्षित, नोकरदार वर्गामुळे धम्म वाढू लागला. विचारवंतांची दुसरी पिढीसुद्धा जोमानं पुढे आली. गावागावांमध्येही वैचारिक कार्यक्रम वाढू लागले आणि एक विचारधारा मूळ धरायला लागली. या सर्व गोष्टींचे परिणाम फार चांगल्या पद्धतीने दिसायला लागले आहेत. राहणीमानामध्ये बदल बघायला मिळत आहेत. एकेकाळी दबून राहणारा समाज, आता पुढे यायला लागलाय. धम्मक्रांतीमुळे अंधश्रद्धा, बुरसटलेली मानसिकता सोडून बुद्धाची विज्ञानवादी विचारधारा स्वीकारू लागला. मी देवाला मानत नाही असे ठामपणे सांगू लागला. महिलांचा यामध्ये खूप पुढाकार आहे. ठिकठिकाणी विहारांमध्ये महिला उपासिका वंदनेसाठी जातात. ज्यामध्ये मुलांचाही सहभाग व्हायला लागला. शहरामधील राहणीमान तर बदललेच; पण ग्रामीण भागातील लोकांची परिस्थितीही थोडीफार चांगली व्हायला लागली, ही फार आनंदाची गोष्ट आहे.

शिक्षणामध्ये नवबौद्धांचे प्रमाण फार चांगले आणि टक्केवारीमध्ये ब्राह्मणांच्या बरोबरीने आले आहे. वैचारिकदृष्ट्याही फार झेप या समाजाने घेतली आहे. मराठी साहित्य संमेलनाचे

अध्यक्षपदही उत्तमराव कांबळे यांच्यासारख्या विचारवंताला सन्मानासहित देण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमांतून, भव्यदिव्य नाटकांमधून बुद्धाचे, बाबासाहेबांचे चरित्र मांडायला लागले आहेत. राजकारणातही स्वतःचे अस्तित्व दाखवायला लागले आहेत. आपण दुसऱ्याही समाजाला दिशी देऊ शकतो, त्यांना आपण लीड करू शकतो हा विचारही नवबौद्धांमध्ये यायला लागला आहे. बुद्धाचे समतेवर आधारित विचार घेऊन आपण इतरही समाजामध्ये जाऊ शकतो ही धारणा मूळ धरायला लागली आहे.

आताच्या या नव्या पिढीमध्ये मी फार मोठा आत्मविश्वास पाहत आहे. एक चांगली विचारधारा आहे. बाबासाहेबांमुळे आपल्या जीवनात झालेले बदल दिसत आहेत. माझा धर्म वेगळा आहे. मी बुद्धिस्ट आहे असे समाज स्वाभिमानाने सांगू लागला आहे. धम्मक्रांतीच्या सुरुवातीच्या काळात विहारांची तसेच भिक्षूंची संख्या अगदीच नगण्य होती. पंडित राहुल संस्कृतायन, पंडित आनंद कौसल्यायन असे बोटावर मोजण्याएवढेच भिक्षू त्यावेळेस होते. मधल्या काळात असे भिक्षू तयार होऊ शकले नाहीत. जसे मी सांगितले की, ७० ते ९० च्या दशकात



समाजामध्ये फार वैचारिक, सामाजिक उलथापालथ झाली आणि आताची पिढी धम्मावरही लक्ष द्यायला लागली. त्यामुळेच आज भिक्षूंना आदराचे स्थान मिळत आहे. नवीन भिक्षू तयार होण्याची प्रक्रिया जोम धरायला लागली आहे. चांगले प्रशिक्षित भिक्खू तयार व्हायला पाहिजेत व त्यांच्यासाठी प्रशिक्षण केंद्र असायला पाहिजे, हे बाबासाहेबांचे स्वप्न अधुरेच राहिले होते. परंतु, आता औरंगाबाद येथे ''लोकुत्तरा आंतरराष्ट्रीय भिक्खू प्रशिक्षण केंद्र'' सुरू झाले आहे. अति विशाल अशा या भिक्खू प्रशिक्षण केंद्रामध्ये शंभर भिक्खूंची निवासी व्यवस्था आहे. अद्ययावत लायब्ररीसुद्धा आहे. हे सर्व ४०-५० हजार चौरस फुटांचे केंद्र ज्येष्ठ सनदी अधिकारी डॉ. हर्षदीप कांबळे आणि त्यांच्या पत्नी रोजाना व्हनिच कांबळे (थायलंडच्या निवासी) यांनी बांधून भारतीय भिक्खू संघाला दान दिले आहे. देशातील हे असे पहिलेच सेंटर असून, धम्माच्या प्रचार-प्रचारासाठीचे कांबळे दांपत्याचे हे ऐतिहासिक काम बाबासाहेबांच्या धम्मक्रांतीमुळेच झाले आहे, हे लक्षात घ्यायला पाहिजे. इथे देशविदेशातून ज्येष्ठ भिक्खू भारतीय भिक्षूंना प्रशिक्षण देणार आहेत. आज महाराष्ट्रात, भारतात बरेच भिक्खू असले तरीही त्यांची वैचारिक उंची अजून वाढविण्याची गरज आहे हे मी मान्य करतो. आज भिक्षू पूजा, परित्राण, पाठ, लग्न समारंभ यामध्येच जास्त अडकून पडले आहे. बुद्धांची फिलॉसॉफी काय आहे, निर्वाणाच्या मार्गावर कसे जाता येईल, त्याकरिता स्वतःचे आचरण कसे शुद्ध ठेवता येईल या बाबींवर भिक्षूंनी जास्त लक्ष द्यायला पाहिजे. स्वतःची साधनसंपत्ती तयार न करता, समाजाप्रति समर्पित भावना ठेवायला पाहिजे. भिक्षूंनी धम्माबरोबरच लोकांचे सामाजिक ज्ञानसुद्धा वाढवून त्यांना नवीन जगामध्ये वैचारिक ताकद वाढवायची व आचरणाद्वारे दुसऱ्या इतर जातींतील लोकांची मने जिंकायची, प्रेरणा द्यावी असे बाबासाहेबांना वाटत होते. याकरिता स्वतः खूप ज्ञान अर्जन करायला पाहिजे. त्यासाठी खूप मेहनत घ्यायला पाहिजे. लोकांच्या पाठिंब्यावर नवे मठाधिपती न बनता गावागावांमध्ये फिरून, प्रचार-प्रसार करून, लोकांमध्ये चेतना निर्माण करण्याची मोठी जबाबदारी घेतली तरच या समाजाची वैचारिक दृष्टी मजबूत व्हायला मदत होईल हे सर्व भिक्षूंनी समजून घ्यायला पाहिजे. लोकुत्तरासारख्या प्रशिक्षण केंद्रामधून या पद्धतीने ज्ञान मिळायला पाहिजे अशी जास्त सेंटर व्हायला पाहिजेत.

***

मुलाखत



# महालढाई बनल्या आहेत कल्पना सरोज

कधीकाळी मुंबईत प्रवासासाठी तिकिटाला पैसे नसणाऱ्या **कल्पना सरोज** आज जगभरात विमानात बिझनेस क्लासने फिरतात. त्यांच्याकडे मर्सडीज, बीएमडब्ल्यू अशा गाड्या असून, मुंबईतील अत्यंत महागड्या ठिकाणी त्यांचे आलिशान कार्यालय आहे. भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कार दिला आहे. देशातील पहिल्या महिला बँकेच्या त्या संचालक होत्या. अत्यंत बिकट परिस्थितीत त्यांनी सुरू केलेला प्रवास हा भारतीयांसाठी अभिमानास्पद आहे. त्यांच्या यशाचे पैलू उलगडणारेहि मुलाखत...

**प्रश्न : एक सर्वसामान्य कल्पना ते पद्मश्री कल्पना सरोज हा प्रवास समजून घ्यायचा आहे?**

**उत्तर :** माझ्या जीवनाचा प्रवास प्रचंड संघर्षाचा तितकाच वेदनादायी आहे. खूप परिश्रमाने मी पुढे आली आहे. माझा जन्म अकोला जिल्ह्यातील एका खेडेगावचा. एका सर्वसामान्य बौद्ध कुटुंबातून मी पुढे आली आहे. दोन भाऊ, दोन बहिणी, घरकाम करणारी आई आणि पोलिस खात्यात कॉन्स्टेबल असलेले वडील असा आमचा पूर्ण परिवार. मी जेमतेम १२ वर्षांची असतानाच खेड्यातल्या परंपरेनुसार माझा विवाह उल्हासनगर येथील एका तरुणासोबत झाला. लग्न, घर, संसार या गोष्टींची कल्पनाही नसताना मला या गोष्टींना सामोरे जावे लागत होते. ज्या मुलासोबत आई-वडिलांनी लग्न लावून दिले तो अत्यंत व्यसनी होता. त्याचा परिवार मोठा होता. त्या सर्व परिवाराचं जेवण बनवणं, त्यांचे कपडे धुणे इत्यादी कामं मला एकटीलाच करावी लागत होती. थोडीही चूक झाली किंवा जेवणात मीठ-मिरची कमी-जास्त झाली तर नवऱ्याबरोबरच सासू, नणंद, दीर असे सगळेच मला मारहाण करत. प्रचंड मानसिक, शारीरिक त्रास मी सहन केला. आजही त्या आठवणी अंगावर शहारे आणतात.

**प्रश्न : तुम्ही विरोध केला नाही का? घरच्यांनी याकडे लक्ष दिले नाही का?**

**उत्तर** : आई-वडिलांनी सांगितल्यामुळे जुन्या रीतिरिवाजाप्रमाणे जे आहे त्याच्यात समाधान मानून दिवस ढकलत होते. एकदा माझे बाबा भेटायला आले, त्यावेळेस माझी परिस्थिती पाहून ते प्रचंड दुःखी झाले. मला त्या घरात एका मोलकरणीसारखीच वागणूक मिळते असे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी सासू-सासऱ्यांना, नवऱ्याला जाब विचारला म्हणून त्यांनाही शिवीगाळ व धक्काबुक्की केली. ते मला गावी घेऊन गेले. काही दिवस मी गावात राहिले. त्यावेळची स्टोरी तर वेगळीच आहे. असो.

**प्रश्न : काय वेगळी स्टोरी?**

**उत्तर** : आज खरंतर या आठवणी काढायची गरज नाही; पण तुम्ही विचारताय म्हणून सांगावं लागतं आहे. पूर्वी गावखेड्यात लग्न लावून दिल्यानंतर मुलीला कितीही त्रास होत असला तरी तिने सासरीच राहिले पाहिजे, अशी परंपरा होती. दोन-चार महिन्यांत शेजारीपाजारी, भाऊबंदकी माझ्याविषयी काहीही बोलत होती. माझी काहीच चूक नसताना मला ऐकावे लागत होते. एकवेळ तर मी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला; पण मला माझ्या आत्यानं वाचवलं. मी गावी न राहता मुंबईला माझ्या चुलत्यांकडे राहण्याचा निर्णय घेतला.

**प्रश्न : मुंबईतला प्रवास कसा सुरू झाला?**

**उत्तर** : मुंबईत आल्यानंतर तर चुलत्यांशिवाय माझा दुसरा कोणताही आधार नव्हता. ते दिवसभर कामावर जात होते. त्यांना माझी काळजी वाटायची. काका कामाला गेल्यानंतर माझा बराचसा वेळ शेजारीच असलेल्या गुजराती परिवारातील मुलींसोबत जायचा. त्या परिवाराने मला त्यांच्या मुलीप्रमाणेच वागणूक दिली. त्यांच्यात सामील करून घेतले. तिथेच असताना मी कामाचा शोध घेतला. मी कपडे शिवायचं काम शिकले. मला काही काम मिळेल का? याचा शोध घेत असताना एक-दोन महिन्यांचा वेळ गेला पण मला काम मिळाले.

**प्रश्न : पहिल्या कामाची काय आठवण होती? कसले काम मिळाले?**

**उत्तर** : शिलाईच्या कामाची सुरुवात सनमील कंपाउंड परेल येथे सुरू झाली. त्या मोठ्या कंपनीत एवढी मुले-मुली एकत्र काम करताना बघून सुरुवातीला मला धडकीच भरली. जेव्हा शिलाई मशीन दिली तेव्हा माझ्याकडून ती मशीन चालूच होत नव्हती. तिथला मास्टर माझ्यावर खूप चिडला व बोलला, ''आता कुछ भी नही, और बोल रही हो में कारागीर हूँ, चलो भागो यहां से! हमारे पास कोई काम नही तुम्हारे लिये।'' असे म्हणून त्याने परत पाठवले. तरी काम मिळावे म्हणून विनंती केली. शेवटी मला त्यांनी धागे कापण्याचं काम दिलं. त्यावेळी मला ६० रुपये महिना रोजगार मिळायचा.

**प्रश्न : सुरुवात हेल्परपासून झाली?**

**उत्तर** : हो. ते काम मी महिनाभर केलं. मग मी मशीनवर बसायला सुरुवात केली. मशीन तर मला चालवता येतच होती. फक्त भीतीमुळे ती अगोदर माझ्याने चालवली जात नव्हती. दुसऱ्या महिन्यापासून मी २५० रुपये कमवायला सुरुवात केली. अंगावरचे काम होते. शिलाईच्या कामात मी एक्स्पर्ट होते. ६० रुपये पगारानंतर मी पहिल्यांदाच १०० रुपये कसे असतात ते पाहिले होते. ते पैसे मी त्या गुजराती फॅमिलीला द्यायचं ठरवलं. त्यांनी ते माझ्याकडून घेतले नाहीत.

**प्रश्न : गुजराती फॅमिलीला का बरं! आणि त्यांनी ते का घेतले नाहीत?**

**उत्तर** : ''हम बेटीओंसे पैसे नही लेते, हम बेटीओंको पैसे देते है, हम नही लेंगे'' असे ते बोलले. मी त्यांना बोलले की, मी या पैशांचे काय करणार? तुम्हीच घ्या. माझी जिद्द बघून त्यांनी पैसे ठेवून दिले. दोन ते अडीच वर्षे मी त्या फॅमिलीकडे राहिले. त्या काळात बरेच पैसे माझ्याकडे झाले होते. माझा सांभाळ गुजराती फॅमिलीने केला. मी गावाकडून स्वतंत्रपणे मुंबईला आल्यानंतर मी त्या परिवाराकडे राहिले. त्यांच्या मुलींसोबत वाढले. तिथून काम मिळवले. तो माझा पहिला पगार होता. तो मी त्यांना देऊ केला, परंतु त्यांनी तो घेतला नाही.

**प्रश्न : तुमच्या वडिलांना या दरम्यानच नोकरीवरून काढण्यात आले होते?**

**उत्तर** : पोलिस खात्यात खूप जातीयवाद चालतो. माझे बाबा तेथे मुन्शीचे हेड झाले होते. पोलिस स्टेशनमध्ये त्यांच्या अंडर तो मालखाना असायचा, त्यामुळे चोरीला आलेला माल किंवा त्यांच्या रायफल, काडतुसं अशा सर्व गोष्टींच्या सुरक्षेची जबाबदारी त्यांच्यावर असायची. माझ्या बाबांनी त्यांच्या सोबतच्या माणसांना चोरीचा माल पळवापळवीत मदत केली नाही म्हणून काही द्वेषी व्यक्तींनी षडयंत्र रचलं. त्यांच्यावर घड्याळ चोरीचा आरोप लावला. त्यांची नोकरी गेली. बाबांचा स्वभाव खूप स्वच्छ होता. बाबांना खूप मोठा धक्का बसला. आरोप ते पचवू शकत नव्हते. बरेच वातावरण खराब झाले. आमच्या घराची दशा व्हायला सुरुवात झाली. मग मी पूर्ण परिवारच मुंबईत बोलवला. दादरला घर घेऊ शकेन अशी परिस्थिती नव्हती. म्हणून कल्याणमध्ये मी ४०० रुपये डिपॉझिट आणि ४० रुपये भाड्याची रूम घेतली.

**प्रश्न : पुढे प्रवास कसा झाला?**

**उत्तर** : खरं सांगायचं तर मी बिझनेसमॅन बनेन असा मी विचारही केलेला नव्हता. कारण व्यवसायाची आपल्याला कुठलीही पार्श्वभूमी नव्हती. एक दिवस उपाशी तर एक दिवस जेवण असं सगळं चाललं होतं. २५०, ३०० रुपये पगाराची नोकरी होती. त्याच्यात माझा रेल्वेचा पास. एवढं मोठं कुटुंब माझ्याकडे राहत होतं. माझ्यासमोर खूप दुःखाची घटना घडली होती.

**प्रश्न : कोणती?**

**उत्तर** : माझी एक बहीण बिमार होती. पैशांमुळे आम्ही तिचा इलाज नाही करू शकलो. दुर्दैवाने ती गेली. माझा खरा संघर्ष तिथून सुरू झाला. मी फक्त पैशांअभावी तिला वाचवू शकले नाही. आजारी असताना ती मला सांगत होती की, ताई मला वाचव, मला मरायचं नाहीये; पण गरिबीमुळे मी तिला वाचवू शकले नाही. आजसुद्धा ते डोळे मला दिसतात. हा प्रसंग खूप भयानक होता. मी पूर्णपणे

हादरून गेले होते. तेव्हा मी ठरवलं की, मी पैसे कमवलेच पाहिजेत. पण कसे हाही एक मोठा प्रश्न होता. मी ठरवलं एक-दोन मशीन टाकू; कारण मला तेच काम येत होतं. भाड्याचे एक दुकान घेऊ आणि कसंबसं सुरू करू. सरकार महात्मा फुले मंडळातून व्यवसाय करण्यासाठी लोन देतंय हे रेडिओवर ऐकलं होतं. मी लोन मिळवण्याचे ठरवले. लोनसाठी पेपर कसे बनतील, ते कोण बनवून देणार हे प्रश्न उभे राहिले. एका कार्यकर्त्याच्या माध्यमातून तो प्रयत्न केला. एक महिना मी रोज त्याच्या घरी फेऱ्या मारल्या. त्याचे वागणे-बोलणे वेगळेच होते. तो फारच घमंडी होता. त्याने मदत केली नाही. परंतु त्याच्या सोबतच्या एका कार्यकर्त्याने मला पंचायत समितीमध्ये घेऊन गेला. त्या ठिकाणी मला फॉर्म कसा भरायचा, त्याला काय डॉक्युमेंट लागतात हे समजावले. जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला या सर्व पेपरसाठी मला गावी जावं लागलं. महात्मा फुले महामंडळातून ५०,००० रुपयांचं कर्ज मी मिळवलं. कर्ज मिळवताना खूप त्रास झाला. पण माझ्या डोक्यात एकच होतं की, भाड्याचं दुकान घ्यायचं. तीन-चार मशीन आणि आपलं एक बुटिक सुरू करायचं. ते मी सुरू केलं. खूप काम केलं व ते सुरळीत चालवले. थोडे पैसे जमवले. उल्हासनगरमध्ये फर्निचरचं खूप चांगलं मार्केट होतं. त्या ठिकाणी मी सर्वप्रथम फर्निचरच्या व्यवसायात पैसे टाकले, व्यवसायात जम बसवला. हे करत असताना मला जाणवलं की, माझ्यासारखे खूप लोक बेरोजगार आहेत. त्यांना कामाची गरज आहे. त्यांच्यासाठी काही करावे हा विचार डोक्यात आला.

**प्रश्न : या दरम्यान तुम्ही एक संघटना काढली. ती का काढावीशी वाटली?**

**उत्तर** : ''सुशिक्षित बेरोजगार संघटना'' काढण्यामागचा उद्देश, बेरोजगारांचा त्रास कमी करणे. कारण मी कर्ज मिळवताना, व्यवसाय सुरू करताना जो त्रास सहन करत होते तो इतरांना होऊ देऊ नये असे वाटले. नोकरी करत असताना दोन वेळचं जेवण आम्हाला मिळत नसायचं. तरीसुद्धा आम्ही कसेबसे दिवस काढायचो. आज तर मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत. मुलांची बेरोजगारी दूर करण्यासाठी नोकरीशिवाय दुसरा मार्ग उद्योजक बनवणं हाच आहे. मी ज्या पद्धतीने उद्योजक झाले, त्याप्रमाणे इतर बेरोजगार मी उद्योगामध्ये आणले पाहिजे म्हणून संघटना स्थापन केली.

**प्रश्न : प्रतिसाद कसा मिळाला?**

**उत्तर** : खूप चांगला. संघटनेमुळेच तर माझं नाव पुढे आलं. मी खूप प्रामाणिकपणे मुलांना मदत केली. त्यामुळे लोकांच्या चुली पेटायला लागल्या. चुकीच्या मार्गाला लागलेली मुलंही सोबत आली. व्यवसाय करू लागली. त्यांच्यामागे मी खंबीरपणे उभे राहिले.

**प्रश्न : संघटन कसं वाढवलं?**

**उत्तर** : मी स्वतः बेरोजगार होते. नंतर मी रोजगार मिळवला. यशस्वी झाले. त्यामुळे माझ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. काम करत असताना माझ्या ओळखी वाढल्या. जिल्हाधिकारी, उद्योग अधिकारी, तहसीलदार यांच्या ओळखी झाल्या. त्या ओळखीचा फायदा घेऊन मी मुलांनासुद्धा त्यांच्या भेटी घडवून आणल्या. आम्ही बेरोजगार युवकांचे-युवतींचे शिबिर भरवायचो. अधिकारी वर्गाला आम्ही कार्यक्रमांना बोलवायचो. महात्मा जोतिबा फुले मंडळ असेल, खादी ग्रामोद्योग असेल, बँकेचे अधिकारी यांना निमंत्रण द्यायचो. पाहुणा म्हणून डीसी, एसीपी यांसारख्या लोकांना बोलावून कार्यक्रम करायचो. ते लोक मार्गदर्शन करायचे. बरीच मुलं तिथल्या तिथेच फॉर्म भरायचे आणि बऱ्याच मुलांचे बँकेकडून कर्ज मंजूर व्हायचे. मुलांना रोजगार मिळायला लागला आणि लोकांमध्ये माझं नाव आपोआप जायला लागलं. लोकांच्या फायद्यासाठी मी ते काम करत होते. त्या काळात अनेक मुलांना सरकारी नोकरीसाठीही मार्गदर्शन मिळवून दिले. पोलिस खातं, मंत्रालय त्या ठिकाणी मी नोकरीचा मार्ग सुद्धा त्यांना दाखवला. मी पैसे घेऊन नोकरी लावते असं म्हणणारेही लोक तेव्हा होते. ते पैसे तर घ्यायचे पण नोकरी देत नव्हते. मग ते पैसे परत मिळवून देण्याचं कामसुद्धा करायचे. गरिबांना फसवणाऱ्यांना जाब विचारायची.



**प्रश्न : याचा तुम्हाला त्रास झाला नाही?**

**उत्तर :** सुरुवातीला मला याचा फार त्रास झाला. एक महिला जेव्हा घराच्या बाहेर जाते तेव्हा तिच्याकडे लोकांच्या बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. आता घराच्या बाहेर गेल्याशिवाय काही काम होणार नाही. मी चांगलं काम करत असल्यामुळे लोकांचा माझ्याकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन झाला. याचा मला फायदा झाला. लोकांच्या सर्व अडचणींना मी तोंड द्यायची. मदत करायची.

**प्रश्न : तुम्हाला महात्मा फुले मंडळाचे कर्ज घेण्यासाठी अडचणी आल्या. आता तुम्हीच महिला बँकेच्या संचालक आहात.**

**उत्तर :** या गोष्टीला बाबासाहेबांची कमाल म्हणता येईल. ५०,००० रुपयांचं लोन काढताना मला खूप त्रास झाला. परंतु मी बी.एम.बी. बँकेची डायरेक्टर झाले. त्या ठिकाणी पन्नास कोटी रुपयांचे लोन मंजूर करताना माझ्या सह्या झाल्या. ही बाबासाहेबांची पुण्याईच होती. मी देशातली पहिली महिला बी.एम.बी. बँकेची संचालक होते. तत्कालीन प्रधानमंत्री मनमोहन सिंग आणि अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी या बँकेचे उद्घाटन केले होते. त्यांनीच या बँकेचं मला डायरेक्टर केलं.

**प्रश्न : बांधकाम व्यवसायाकडे कसे वळलात?**

**उत्तर :** मी कल्याणमध्ये राहत असताना काही पैसे जमा करून जागा विकत घेतली होती. पैशांअभावी घर बांधणे झाले नाही. मात्र जागेचा भाव वाढला होता. एकटी महिला बघून स्थानिक गुंडांनी, राजकारण्यांनी ती जागा हडपण्याचा प्लॅन केला. मात्र मी ताकदीने लढा दिला. पोलिसांत गेले. त्यांनी याचा राग मनात घेऊन मला मारण्याची सुपारी दिली तेव्हा मी ''शंभर दिवस शेळी होऊन जगण्यापेक्षा एक दिवस वाघ होऊन जगा'' बाबासाहेबांचं हे वाक्य मनावर कोरून घेतलं.

मी सरळ पोलिस कमिशनर भुजंगराव मोहिते यांच्याकडे गेले. त्यांना मी सर्व प्रकार सांगितला. त्यांनी डीसीपींना फोन करून सर्व यंत्रणा कामाला लावली. सर्व लोक दोन दिवसांत शोधून काढले. त्यांना अटक केली.

**प्रश्न : परंतु तुम्ही अटक केलेल्याच काही मुलांना सोडायला सांगितले! हे का?**

**उत्तर :** काही मुलं खूपच गरीब कुटुंबातील होती. त्यांच्या आई-वडिलांनी माझ्यापुढे विनंत्या केल्या. मी त्यांना बोलले तुम्ही तुमच्या मुलांना अशा कामाला का लावता? त्यांना चांगला मार्ग शिकवा. मी पोलिसांना त्या मुलांना सोडून द्यायला सांगितलं. पोलिसांनी मला सिक्युरिटी घ्यायला सांगितली. पण मी त्यांना रिव्हॉल्वरचा परवाना मागितला. १९९९ मध्ये मी सकाळी ११ वाजता लायसन्सची मागणी केली तर सायंकाळी सहा वाजता मला परवानगी मिळाली. त्यानंतर मी रिव्हॉल्वर घेतली. पण काही कुठे वापर केला नाही. बुद्धांची पाईक असल्यामुळे तशी वेळपण आली नाही. मी फक्त स्वरक्षणासाठी ती घेतली.

**प्रश्न : आता परवाना आहे का?**

**उत्तर :** आहे ना. मला बांधकाम व्यवसायात याचा फायदा झाला. मला महिला म्हणून कोणी डिवचू शकले नव्हते.

**प्रश्न : पुढे तुम्ही कमानी ट्यूबकडे गेलात. मला समजत नाही, १४० केसेस त्या कंपनीच्या संदर्भात होत्या. जवळजवळ ३५०० मजूर लोक, दोन संघटना, ११६ कोटींचं कर्ज, तरी तुम्ही कंपनी घेतली? कशी हिम्मत झाली?**

**उत्तर :** ही हिम्मतच आहे. बाबासाहेबांच्या विचाराने आपण प्रेरित झालेलो आहोत. बाबासाहेब एवढे लढत होते समाजासाठी. त्यांना कोणाचा आधार नव्हता, आपल्याला तर एवढे सगळे मार्ग आहेत, तरीसुद्धा आपण माघार घ्यायची हे मला पटत नव्हतं. कठीण प्रसंगाला तोंड द्यायचं हेच मी ठरवलं होतं. बाबासाहेबांचे संविधान सोबत होते. मी हिम्मत केली. दोन युनियन, ११६ कोटींचं कर्ज, १४० लिटिगेशनच्या केसेस आणि अशा परिस्थितीत कामगार माझ्याकडे आले. कंपनी मी टेकओव्हर करा अशी विनंती केली. कुर्ल्याला २२ एकर जमीन होती, त्या ठिकाणी कमानी इंजिनिअर, कमानी मेटल आणि कमानी ट्यूब चार एकरमध्ये होती. ही देशातील पहिली कंपनी आहे जिला सुप्रीम कोर्टाने कामगारांना कंपनीचे मालक केले. मालकाला बाजूला केले. ३५०० मालक झाले तर काम करणार कोण? आपल्या कंपनीमध्ये ५६६ वर्कर होते. मी त्यांना सांगितलं की, मला इंडस्ट्रीचा अनुभव नाही. मी येथे येऊन काय करणार? कामगारांचा माझ्यावर विश्वास होता. मी विचार केला की, समाजासाठी काम करायचं, यांच्यासाठी जर मला काम करता आलं तर बरं होईल. यामध्ये पाच बँकेचे बोर्ड होते. देना बँक, आयडीबीआय बँक, बीओडी बँक अशा पद्धतीने कर्जाचे बोर्ड बघितले. मला ते फेडता येतील असे वाटले. त्यासाठी काय करावे लागेल हे कामगारांना सांगितले. तेव्हा कामगारांनी मला कंपनी टेकओव्हर करायला सांगून कंपनीचे अध्यक्षपद देतो व आजपासून तुम्ही कंपनीची सर्व कामे बघा अशी विनंती केली. मी त्यात सहभाग घेतला.

**प्रश्न : हा आत्मविश्वास तुमच्या कामी आला?**

**उत्तर :** हो अगदीच, माझा माझ्यावरच खूप विश्वास आहे की, मी कोणतेही काम करू शकते. मी मार्ग शोधून काम करते. मी ठरवलं होते, मला कामगारांना न्याय मिळवून द्यायचाय. कुर्ला फॅक्टरीमधील जमीन कामगारांनी विकलेली होती. फक्त तिथे मशीन होत्या. कंपनीकडे फक्त बंगलोरमध्ये चार एकर जमीन शिल्लक होती आणि या जमिनीवर १४० केसेस होत्या. मी जेव्हा कंपनीत आले तेव्हा बोर्डने सांगितले की, तुम्हाला डे टू डेचा खर्च करावा लागेल आणि तुम्हाला कंपनी मिळेल की नाही हे कोर्ट ठरवेल.

**प्रश्न : तरीही तुम्ही कंपनीत काम केले. पैसे टाकत गेलात?**

**उत्तर :** हो. मला विश्वास वाटत होता. मी २००० पासून या कंपनीमध्ये आले. मी विचार केला की, ११६ कोटी एवढं कर्ज कसं झालं? तेव्हा मला समजलं की, एका नेत्याने ७० लाख दिले होते. शिवाय पाच बँकांचे कर्ज आता यांचं व्याज दुप्पट, तिप्पट



**माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार स्वीकारताना कल्पना सरोज**

झालेलं आहे. व्याज आणि इंटरेस्ट माफ करून मूळ मुद्दल दिली तरी बरे होईल हा विचार मी केला आणि कामाला लागले. आनंदराव अडसूळ वित्तमंत्री होते. त्यांच्याकडे गेले, त्यांना भेटले. त्यांना सर्व प्रकार सांगितला. कंपनीवर असलेल्या कर्जाची मी मुद्दल भरू शकते, पण व्याज मला भरता येणार नाही. यात मदत करावी ही विनंती केली. तेव्हा आयडीबीआयमध्ये आमची मीटिंग झाली. सर्व बँकांच्या चेअरमनला त्यांनी बोलावून घेतलं. त्यांनी मला फक्त पॅनल्टी आणि व्याजच माफ न करता मुद्दलही २५ टक्के माफ केली. एक अट टाकली की, ही सर्व रक्कम तुम्ही मला एक वर्षाच्या आत द्यावी. कोर्टाप्रमाणे ते सात वर्षांत परत करायचे होते. जवळपास १५ कोटी रुपये द्यायचे होते. त्यांना मी ओटीएस लिहून दिलं. गव्हर्मेंटच्या लोकांनी सपोर्ट केला. याच दरम्यान बीपीटीवाले लोक सपोर्ट करत नव्हते. त्यांचे १.६ कोटींचे कर्ज होते. त्या ठिकाणी राणी जाधव अध्यक्ष होत्या. त्यांची भेट घेतली. त्यांना मी सांगितलं की, स्किम पास झाल्यानंतर मी तुम्हाला आठ दिवसांच्या आत पैसे देते. त्यांनी नकार दिला. त्यांना मी पोस्ट डेटेड चेक दिला, तेव्हा त्यांच्या वकिलांनी मला सपोर्ट केला. २००६ मध्ये मी सर्व कर्ज फेडले. तेव्हा कोर्टाने निकाल दिला. आज कंपनीची मी पूर्णपणे मालक आहे.

**प्रश्न : तुम्हाला बांधकाम व्यवसायात येताना काय त्रास झाला?**

**उत्तर** : कृपाशंकर सिंग यांच्या एका नातेवाइकाने मला खूप त्रास दिला. माझी जागा बळकावण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मी सोनिया गांधींकडे गेले. मी तेवढी हिम्मत दाखवली, मी कुठे हरले नाही. मी नेहमी वरच्या माणसाकडे जाऊन माझे काम करून घेत होते. ज्यावेळी तो माणूस मला त्रास देत होता त्यावेळी तो काँग्रेसचा जीएस होता. मी सोनिया गांधींना भेटून हा सर्व प्रकार सांगितला. त्यांनी त्या माणसाला जीएस पदावरून काढून टाकलं. त्यांनी राज्यपालांना पत्र लिहून त्याच्यावर कारवाई करण्यास सांगितले. मला कारवाई वगैरे काही करायची नव्हती. मला माझा बिझनेस करायचा होता. पहिली इमारत 'माता पार्वती' या नावाने उभारली. पार्वती माझ्या आईचे नाव होते. धम्माचे सर्व धर्मगुरू मी तिथे बोलावले. पूजा घेतली. त्या दिवशीसुद्धा गुंड रिव्हॉल्वर घेऊन आले होते. मी खमकी होते. संघर्ष करत होते.

**प्रश्न : तुम्ही सोनिया गांधींना २ वेळा भेटलात?**

**उत्तर** : बंगलोरमध्ये कमानी कंपनीची चार एकर जागा होती. कंपनी नियमाने ती माझ्याकडे आली होती. कंपनीत वाद होते. प्रकरण कोर्टात होते. त्या दरम्यान ती जागा पडून होती. तिथे लोकांनी अतिक्रमण केले होते. मेट्रोने स्टेशन उभारायचे ठरवले होते. ते सर्व अतिक्रमण मी खूप मेहनतीने काढले. दरम्यान काही लोकांनी केसेस केल्या तेव्हा जमिनीचा लिलाव करून द्या, असा आदेश कोर्टाने दिला. लिलाव झाला पण पैसे येत नव्हते. ज्याने लिलाव जिंकला त्याने पैसे देणे टाळले, पण जागा ताब्यात घेतली. पोलिस त्याला मदत करत. तेव्हा सोनिया गांधीजींना दिल्लीत जाऊन भेटले. अन्याय काय आहे तो सांगितला. त्यांनी लगेच कर्नाटक सरकारला फोन करून सांगितलं की, "ये जो लेडी है ना, वो भारत की आयकॉन है!" असे शब्द त्यांनी त्या ठिकाणी उच्चारले. और पूरी काँग्रेस पार्टी इसके साथ खडी है। इसके उपर जो अन्याय होगा वो बरदाश्त नही होगा। तो मैं इसे भेज रही हूँ, इसका देख लो क्या है।" आणि मग मी परत तिकडे गेले. मला प्रचंड त्रास देणाऱ्यांवर ॲट्रॉसिटी दाखल केली. माझा दिनक्रम मुंबई, दिल्ली, बंगलोर असा झाला होता. खूप धावपळ करून मी तिकडे आज पाच लाख फूट अशी ती बिल्डिंग उभी करत आहे. आज तिथे काम सुरू आहे. ५०० कोटी रुपयांची प्रॉपर्टी मी वाचवली. कर्नाटकचे लोक खूप डेंजर असतात असे मला खूप लोक सांगायचे. तेव्हा मी त्यांना बोलायचे, मी बाबासाहेबांची औलाद आहे, मला हरवणं एवढं सोपं नाही. मला जातीचा, स्त्री असण्याचा त्रास झाला. मी त्याचा सामना केला. जात म्हणून रडत नाही बसले. मी त्याचा इश्यू नाही केला. माझी लढाई मी स्वतःच लढले.

जगात जीवन आणि मरण या दोन्ही गोष्टी सत्य आहेत. यापेक्षा मोठं सत्य काहीच नाही. त्यामुळे मी जिवाची बाजी लावून या गोष्टी केल्या. मरणाच्या भीतीपोटी मी माझं काम सोडून नाही दिलं.

**प्रश्न : या प्रोजेक्टमध्ये तुम्ही काय करणार आहात?**

**उत्तर** : राहण्यासाठी घरे बनवणार आहे. २ बीएचके, ३ बीएचके अशी ती असतील. जागा मेन रोडवर आणि खूप मोक्याच्या ठिकाणी आहे. जवळच आयटी पार्क आहे. तिथे येणाऱ्या लोकांसाठी राहण्याजोगे घर उपलब्ध करणार आहे.

**प्रश्न : हे सर्व करत असताना तुम्ही खैरलांजी चित्रपट काढलात. त्याबद्दल काय सांगाल?**

**उत्तर** : संगीताची मला लहानपणापासूनच आवड होती. बाबासाहेबांच्या विचारांची प्रेरणा आणि संगीत ज्यांनी मला जगण्याची प्रेरणा दिली. 'खैरलांजी' चित्रपट बनविण्यापाठीमागे फक्त सामाजिक बांधिलकी होती. कारण जो अत्याचार खैरलांजीत भोतमांगे कुटुंबावर झालेला आहे, तो खूप भयानक होता. मी रामदास आठवले यांच्या शिष्टमंडळातून फ्रान्सला एका कॉन्फरन्सला गेले होते. मे २००६ पासून हा पिक्चर मला करायचा होता. राजू मेश्राम डायरेक्टर भेटला. मी चित्रपट निर्माण केला. समाजातील काही लोकांनी भोतमांगेच्या मनात

गैरसमज निर्माण करून कोर्टात केस केली. पुढे ती मी जिंकले. ज्या दिवशी तो रिलीज होणार होता त्याआधी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात मी त्याचा प्रोमो केला. आर. आर. पाटीलही बघायला आले होते. आर. आर. पाटील हा चित्रपट बघून अक्षरशः रडले. आर. आर. पाटलांनी भोतमांगेला घरी बोलावलं. त्यांना मदत केली. सुशीलकुमार शिंदे गृहमंत्री होते. त्यांना फोन करून वकिलाची शिफारस केली. आज तो सिनेमा मी लोकांना सीडीद्वारे उपलब्ध करून देणार आहे. तसं माझं बोलणं सुरू आहे.

**प्रश्न : आज कमानी बंधूंचे काम सुरू आहे? आज कुठे आहे ते?**

**उत्तर :** ही कंपनी कमानीची होती. त्यांचा मुलगा नवीन कमानी यांचा मागेच मृत्यू झाला. त्यांची सर्व प्रॉपर्टी बँकेकडे गहाण होती. सर्व लोन मी फेडल्यावर बँकेने पेपर मला दिले. ते मी माझ्याकडे न ठेवता एका जाणिवेने त्यांना त्यांच्या घराचे पेपर व ५१ लाख रुपये नेऊन दिले. त्यांच्यावर जी परिस्थिती आली होती ती मला बघवत नव्हती. तेव्हा ते रडले. त्यांच्याकडे बायकोच्या हार्ट ऑपरेशनसाठी एक रुपयाही नव्हता. त्यांच्या डोळ्याचे ऑपरेशन करण्यासाठीदेखील पैसे नव्हते. मी ५१ लाख रुपये दिल्यावर ते एवढे खूश झाले की, त्यांनी टाइम्स ऑफ इंडियाला मुलाखत देऊन सांगितलं की, कल्पना सरोज मागील जन्मात नक्कीच कमानीची मुलगी राहिली असणार, त्यामुळेच तिला कमानीचं दुःख दिसलं. माझे वर्करसुद्धा माझ्याशी चांगले आहेत. कारण ते मला आई भवानी म्हणूनच हाक मारतात.

आता कुर्ल्यामधून कंपनी हालवून २००९ पासून वाड्यामध्ये सुरू केली आहे. कोर्टाने २०११ मध्ये आपल्याला सिकामधून बाहेर निघायला सांगितलं. २०११ मध्ये बाहेर निघालो. कंपनी नफ्यामध्ये आली. पहिल्या वर्षी साडेतीन कोटी रुपये नफा मिळवला.

**प्रश्न : परदेशी वाऱ्या बऱ्याच होत असतील. कधी काळी रिक्षाला पैसे नसणाऱ्या कल्पना सरोज आता विमानात फिरतात?**

**उत्तर :** बाबासाहेबांची पुण्याई! खूप देशांत फिरले पण आठवण लंडनची येते. बाबासाहेबांची पुजारीन मी आधीपासूनच होते. त्यांच्याच विचारांमुळे त्यांच्या कर्तृत्वामुळे लंडनला गेले होते. एका कार्यक्रमाच्या निमित्तानं गौतम चक्रवर्तींच्या कार्यक्रमाला मी, आठवलेसाहेब, आर. के. गायकवाड असे दोन-तीन लोक लंडनला गेलो होतो. मी जेव्हा लंडनला जायचे तेव्हा बाबासाहेब राहिले त्या घराला भेट देऊन यायचे. ज्यावेळी आम्ही गेलो तेव्हा तिथे त्या घराच्या विक्रीचा खूप मोठा सेल लागलेला होता. आम्हाला धक्काच बसला. आर. के. गायकवाड आणि आमचं ठरलं हे घर सरकारला विकत घ्यायला लावायचं. वरच्या बाजूला मी काम करावं असं आर. के. सर बोलले. आर. डी. शिंदे यांनी त्या घराची प्रस्तावना तयार केली. रमेश कटके सर, आर. के. गायकवाड सर यांनी खूप मेहनत घेतली. मंत्री नितीन राऊत यांनी मदत केली. जवळपास आम्ही सहा महिने काम केले. नवीन सरकार आलं. त्यामध्ये तीन-चार महिने गेले; पण अखेर घर मिळवले. त्यात माझाही रोल होता.

**प्रश्न : मोदींना कधी भेटले? त्यांनी तुमचे कौतुक केले आहे?**

**उत्तर :** ३१ डिसेंबरला मी बँकेची डायरेक्टर होते तेव्हा मी मोदींना भेटले होते. एक मीटिंग मोदी यांच्यासोबत झाली होती. मला त्यांच्या भेटीसाठी वेळ मिळाला. त्याच दिवशी ३.३० वाजता मी आणि माझे सहकारी गोरे दोघे तिथे गेलो. मोदींना मी याबद्दल सांगितलं. तिथे दोन-तीन लोक होते. ते बोलत होते की, बाबासाहेबांचं घर का घ्यायचं? उद्या लोक बोलतील साऊथ आफ्रिकेमध्ये गांधींनी खूप काम केलं, मग त्यांचेसुद्धा घर घ्या, मग काय करायचं? सरकारने हेच काम करायचं का? मी त्यांना बाबासाहेबांबद्दल सांगितलं की, सर्व महापुरुषांपेक्षा बाबासाहेबांचं काम खूप मोठं आहे. त्यांनी सहा वर्षांचा कोर्स दोन वर्षांत पूर्ण केला. तो त्या घरातच. मोदींनी माझं बोलणं ऐकून लगेच होकार दर्शविला. घर घेण्यास संमती दर्शवली. एकाच मीटिंगमध्ये काम यशस्वी झाले. मला खूप आनंद झाला. मग मी महाराष्ट्र सरकारमध्ये सीएमला भेटले. मंत्री राजकुमार बडोले यांना भेटले. २९ डिसेंबर २०१५ ला सभागृहामध्ये कार्यक्रम सुरू असताना लोकांनी मोदींचे आभार मानले. मोदी म्हणाले की, ''धन्यवाद अगर किसको देना होगा तो वो आप कल्पना सरोज को दिजीये, अगर कल्पना सरोज ना होती तो ए बाबासाहब का घर हमें लेने का सौभाग्य ना मिला होता! हम तो सो रहे थे, कल्पना सरोज आई और बोली जागो बाबासाहब का घर बीक रहा है! और हम जाग उठे और हमने खरीद लिया!'' आज मला खूप आनंद वाटतो ते घर घेण्यासंबंधी मला पाठपुरावा करता आला.

**प्रश्न : बाबासाहेबांचं तुमच्या आयुष्यात काय स्थान आहे?**

**उत्तर :** खूप मोठं स्थान आहे, कारण बाबासाहेब आज जर नसते तर आपण समाजात तोऱ्याने जगलो नसतो. मी कुठेच नसते. बाबासाहेबांना माझे सर्व आयुष्य समर्पित आहे.

**प्रश्न : सरकारने तुम्हाला पद्मश्री पुरस्कार दिला?**

**उत्तर :** होय, ज्या मुलीचे बाबा कोणाला सॅल्यूट मारायचे त्यांच्या मुलीला राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार मिळाला. मनमोहन सिंग यांच्या सरकारने मला पद्मश्री पुरस्कार दिला. खरं तर काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी माझ्या अडचणीच्या काळात खूप मदत केली. मी ज्या परिस्थितीतून पुढे आले, अनेकांना मदत केली. एक व्यवसाय उभा केला, अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिले या सर्व गोष्टी विचारात घेऊन सरकारने मला पद्मश्री पुरस्कार दिला त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. मनमोहन सिंग यांच्याच सरकारने मला महिला बँकेच्या संचालकपदी निवडले. खूप संघर्षानंतर प्रामाणिकपणे केलेल्या प्रयत्नांची नोंद म्हणून वेगवेगळ्या पक्ष-संघटनांनी, संस्थांनी, कार्यकर्त्यांनी, परदेशातील काही संस्थांनी वेगवेगळे पुरस्कार दिले आहेत. मानसन्मान दिला आहे. अनेक महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये बोलण्याची, प्रमुख पाहुणे म्हणून हजर राहण्याची संधी मिळाली आहे.

**प्रश्न : पद्मश्री कल्पना सरोज राजकारणात जाणार का?**

**उत्तर :** राजकारणात जाण्याचा माझा बिलकूल मानस नाही. सगळीकडून आमंत्रण येतात. अगदी ममता बॅनर्जींनीसुद्धा आमंत्रण दिलं पण मला समाजकार्याची खुर्ची महत्त्वाची वाटते. ही कोणी हिरावून घेऊ शकत नाही. हल्ली राजकारण खूप घाण झालंय. मी जिथे आहे तिथून मी समाजाचं काम करतच आहे, ते मी केलं पाहिजे. ते माझं कर्तव्य आहे.

(**मुलाखत :** चेतन शिंदे)

***



# बहुजनांचा विद्रोही लेखक

**सांगली जिल्ह्यातील एका छोट्याशा खेड्यातून आलेले डॉ. अण्णासाहेब हरी साळुंखे अर्थात डॉ. आ. ह. साळुंखे यांची वाटचाल प्रेरणादायी आहे. कोणतीही शैक्षणिक अथवा अन्य पार्श्वभूमी नसताना त्यांचे साहित्य संस्कृतीमधील योगदान थक्क करणारे आहे. वैदिक परंपरेला विरोध दर्शवित बहुजनांची सांस्कृतिक गुलामगिरीमधून मुक्तता करणे हे त्यांच्या लिखाणाचे वैशिष्ट्ये आहे.**

सांगली जिल्ह्यात एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले डॉ. आ. ह. साळुखे बहुजनांना ज्या भाषेपासून हजारो वर्षे दूर ठेवण्यात आले त्या संस्कृत विषयाचे केवळ प्राध्यापकच नव्हे, तर महापंडित बनले. साताऱ्याच्या लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य मनोभावे करत असतानाच ते आपल्या अफाट व्यासंगाने, चौफेर चिंतनाने आणि तर्कशुद्ध-चिकित्सक-निर्भीड अभिव्यक्तीने अल्पावधीतच महाराष्ट्राच्या वैचारिक नभांगणात तळपू लागले. भारतीय संस्कृतीच्या अंधाच्या भूतकाळात शिरून त्यांनी संस्कृतीचे अनेकानेक कंगोरे त्यांच्या अस्सल स्वरूपात उजेडात आणले आणि बहुजनांना त्यांचा खरा वारसा दाखवून दिला. अशा तऱ्हेचे काम त्यांच्याशिवाय महाराष्ट्रात कॉ. शरद पाटील यांच्यासारखा एखाददुसरा अपवाद वगळता फारसे कुणी केलेले नाही असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये.

डॉ. साळुखे यांनी मराठी विश्र्वकोशात तुलनात्मक धर्मशास्त्र, संस्कृत इत्यादी विषयात शंभरहून अधिक लेख लिहिले आहेत. १९५९ पासून ते जाहीररीत्या सभांमधून भाषणे देत असले तरी त्यांची महाराष्ट्रभर भटकंती आणि व्याख्याने १९८०-८१ पासून सुरू झाली. त्या सुमारास साळुखे त्यांनी चार्वाकावर लिहिलेली लेखमाला वाईच्या नवभारत मासिकात प्रकाशित झाली आणि दुसऱ्या बाजूने किर्लो स्कर मासिकाच्या जून १९८१ च्या अंकात मराठा समाजावरील आत्मनिरीक्षणात्मक स्वरूपाचा गाजलेला लेख प्रसिद्ध झाला. त्या लेखावर प्रतिक्रिया म्हणून फक्त किर्लो स्करकडे तीन पोती भरतील एवढी पत्रे आली होती. तेव्हापासून आ. ह. साळुखे यांना अखिल महाराष्ट्रातून व्याख्यानांची आमंत्रणांवर आमंत्रणे येऊ लागली. ४ ऑगस्ट २००९ ला महाराष्ट्र सरकारने डॉ. आ. ह. साळुखे यांच्या अध्यक्षतेखाली राज्याचे सांस्कृतिक धोरण ठरवण्यासाठी समिती नेमली होती. समितीने तयार केलेला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणाचा मसुदा २२ जानेवारी २०१० रोजी महाराष्ट्र सरकारला सादर केला. समंत झालेल्या धोरणाच्या अंमलबजावणीसाठीही आ. ह. साळुखे यांची नेमणूक करण्यात आली होती.

डॉ. सांळुखे यांची ग्रंथसंपदा ही चिकित्सा, जिज्ञासा आणि ज्ञानलालसेमधून निर्माण झाली आहे.


अभ्यासपूर्ण शैलीतून त्यांनी समाजाचा विद्रोह मांडला असून, त्यांचे ग्रंथ विचारप्रवर्तक आहेत. जाणकारांनी न्याय न दिलेल्या आणि दुर्लक्षित घटकांबद्दल त्यांनी लिखाण केले आहे. त्यामुळे ते खऱ्या अर्थाने धर्मचिकित्सक आहेत, असेही त्यांच्याविषयी म्हटले जाते. भारताचा सुमारे पाच हजार वर्षांचा इतिहास अभ्यासून विविध स्त्री व्यक्तीरेखा, विविध धर्म संप्रदाय तसेच अनेक बहुजन महामानवांचा स्त्रीविषयक दृष्टीकोण व त्यांची चिकित्सा करून सत्य इतिहासाचा मागोवा त्यांनी घेतला आहे. कोणत्याही प्रवाहात बंदिस्त न होता डॉ.

साळुखेंनी मूळ भारतीय साहित्याला भिडणे या प्रधान हेतूने स्त्रीविषयक मतांची व विचारांची चिकित्सा केली आहे.

संस्कृतीच्या क्षेत्रात शेकडो वर्षांपासून चालत आलेले संघर्ष आणि त्यातल्या गुंतागुंती डॉ. साळुखेंनी अतिशय सुलभ पद्धतीने, सहजसोप्या शैलीत आणि वाचनीय भाषेत उलगडून दाखविल्या. त्यांनी इतिहासाच्या सांस्कृतिक पुर्नमांडणीची गरज अधोरेखित तर केलीच, परंतु तेवढ्यावरच न थांबता त्या कार्याची कसदार पायाभरणी-उभारणीही केली. वरवरचा विचार करणाऱ्यांना या कार्याचे मोल सहज समजणार नाही. धार्मिक शोषण आणि सांस्कृतिक वर्णवर्चस्व अव्याहतपणे अबाधित राखण्यासाठी संस्कृतीच्या ठेकेदारांनी संस्कृतीच्या सर्व अंगोपांगात करून ठेवलेले तिढे आणि गुंते ज्यांना कळतात त्यांनाच डॉ. साळुखे यांचे हे कार्य किती जबरदस्त आणि मूलभूत आहे हे लक्षात येऊ शकेल.

सामान्य माणसाचा कैवार घेऊन त्याच्या सुखदु:खाच्या बाजूने आपली समग्र बुद्धिमत्ता आणि अवघी जीवनशक्ती त्यांनी अक्षरश: पणाला लावली. सामाजिक-सांस्कृतिक क्रांतीचे बीजारोपण आणि संचालन करण्याइतके सामर्थ्य त्यांच्या विचारांच्या ठायी एकवटलेले आहे, हे आज नि:संशयपणे मान्य करावे लागते. या देशातल्या सर्वसामान्य माणसाला हजारो वर्षे कर्मविपाकवादी अवस्थेत ठेवणाच्या अमानवी संस्कृतीचा फुगा कितीही मोठा फुगविला जात असला तरी त्याला एक साधी टाचणी लावल्यास तो तात्काळ फुटतो हा बहुमूल्य संदेश त्यांनी इथल्या बहुजनांना दिला आहे. या निर्भयतेच्या संदेशाने आज मानवमुक्तीच्या लढाईतल्या अगदी तळातल्या माणसालाही प्रचंड आत्मविश्र्वास आणि मनोधैर्य प्राप्त झाले आहे.

महाराष्ट्रात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक अशा विविध क्षेत्रात अनेक पुरोगामी चळवळी आणि त्या अनुषंगाने विचारमंथन होत आलेले आहे. परंतु या सर्व विषयांमध्ये अनेकदा गोंधळाची स्थिती अनुभवास येते. सर्वात मोठी संदिग्धता धार्मिकसांस्कृतिक बाबतीत आहे. अशा संभ्रमित अवकाशात आ. ह. साळुखे यांनी नेमकी, निश्र्चित आणि ठोस भूमिका घेतली. काठावरून केवळ गंमत बघत न बसता ते प्रत्यक्ष रणांगणात उतरले. ज्यांना खरोखरच खोट्याचा नि:पात करायचा असतो आणि खऱ्याचा विजय साकार करायचा असतो त्यांना तटस्थ किंवा भोंगळ राहून चालत नसते. सत्याला भिडावेच लागते. म्हणूनच संत तुकारामाच्या कथित वैकुंठगमनामागची वस्तुस्थिती त्यांनी साधार दाखवून दिली. त्यावरही वाद झाले. परंतु ही सगळी वादांची वादळे त्यांनी समर्थपणे झेलली, पेलली आणि यशस्वीरित्या परतवलीही. व्यासंग हा केवळ व्यासंगासाठी करायचा नसतो, त्यातून समाजपरिवर्तनाच्या दिशा प्रकाशित करायच्या असतात, याची प्रचिती डॉ. साळुखेंच्या कुठल्याही पुस्तकाच्या कुठल्याही पानावर आल्याशिवाय राहत नाही. काळजात आमूलाग्र परिवर्तनाचा उत्कट ध्यास सतत झिरपत असल्याशिवाय असा धीरोदात्त ध्येयवाद जन्माला येऊ शकत नाही. समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी वर्तमानात हिंमतीने उभे राहताना भूतकाळातील उज्ज्वल परंपरांना विसरून चालणार नाही, किंबहुना त्यातच मानवजातीच्या सुखी-संपन्न




भविष्याची प्रेरणाकेंद्रे आहेत, याचे यथार्थ भान डॉ. साळुखेंना आहे. म्हणूनच गौतम बुद्धाला भारतीय मातीतला सर्वोत्तम भूमिपुत्र संबोधून त्याच्या मूल्यप्रणालीला पर्याय नाही, असे नि:संदिग्ध सूचन त्यांनी केले. बळी, शंकर, प्रल्हाद, विरोचन, चार्वाक, कपिल हा बुद्धापूर्वीचा आणि बसवेश्र्वर, चक्रधर, नामदेव, ज्ञानेश्र्वर, एकनाथ, तुकाराम, कबीर हा बुद्धानंतरचा देदीप्यमान वारसा उरात धारण करून बुद्धाकडे गेले पाहिजे, या सर्वांचा विवेकवाद हाच मानवजातीचा मार्गदाता आणि तारणहार आहे, ही त्यांची भूमिका आज परिवर्तनवाद्यांना दिशादिग्दर्शन करते आहे.

डॉ. साळुखे इतका अंतर्बाह्य प्रगल्भ, नम्र, ऋजु, निरागस, दृढनिश्र्चयी, सरळमार्गी आणि प्रसन्न विचारवंत सहसा सापडणार नाही. जीवनावर आणि जीवनात आलेल्या सर्व माणसांवर सारखेच प्रेम करणारा, वेगवेगळ्या छटा असणाऱ्या समविचारींना सांभाळून घेत त्यांना परस्परसन्मुख करणारा, वैचारिक विरोधकांनाही सहृदयतेने समजावून सांगणारा, त्यांच्या मांडणीची उभीआडवी चिरफाड करताना एकही अविवेकी शब्द न उच्चारणारा, वर्तनात पांडित्यपूर्ण अहंकाराचा लवलेशही नसणारा, लेखन-वक्तृत्वादी अभिव्यक्तीत अनुचित भाषेचा वापर होणार नाही याची कुशल काळजी घेणारा आणि तरीही आपल्या विचारांवर, भूमिकांवर, जीवननिष्ठांवर ठाम असणारा अन्य तत्त्ववेत्ता शोधावा लागेल. त्यांच्यासारखा उक्ती आणि कृती यात तफावत नसणारा प्रज्ञावंत विरळाच. बुद्धत्वाच्या फार फार जवळ गेलेले ते आधुनिक काळातले बोधिसत्त्वच आहेत जणू!

**शब्दांकन – सतीश डोंगरे**

बुक पोस्ट


# भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म



– बी. जी. वाघ
निवृत्त सनदी अधिकारी

**डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर ही जगातील अभूतपूर्व घटना होती; कारण त्यांच्याबरोबरच लक्षावधी लोकांनीही आपल्या परंपरागत धर्माचा त्याग केला. एका अमानवी व्यवस्थेविरुद्धचे ते बंड होते. ती एक धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक क्रांती होती. भारतातील हा धर्म होता सर्व विषमतेचे, अन्यायाचे मूळ किंवा माहेरघर. हजारो वर्षांपासून त्याने मानवी अत्याचाराचा कळस गाठलेला होता. त्याला धि:कारून मानवी स्वातंत्र्याची, समतेची घोषणा करणाऱ्या बौद्ध धर्माला त्यांनी स्वीकारले होते. म्हणून या धर्मांतराला जागतिक स्वरूपाचे महत्त्व होते. तो असा धर्म होता की, जो या भूमीतून अस्तंगत झाला होता तरीही त्याचा प्रकाश जगभर पसरलेला होता.**


जागतिक धर्म आणि तत्त्वज्ञानावर त्याचा गाढ प्रभाव होता. एका अर्थाने हे धर्मांतर नव्हते तर धम्मचक्र परिवर्तन होते. बुद्धाने जगाला दिलेले विचार, आचार, कृती व प्रज्ञेचे, बुद्धीचे स्वातंत्र्य. सत्याच्या साधनेसाठी मन मुक्त व निर्भय हवे. पारंपरिक धर्माचा पाया आहे भय व लालच. माणसाला भीती असते ती धर्माची, ईश्वराची, ईश्वरप्रणीत व्यवस्थेची व त्यांच्या व्यवस्थापकांची आणि मृत्यूची. सर्व विद्रोही विचारवंतांशी डॉ. आंबेडकरांचे सख्य होतेच. व्हाल्टेयरचा प्रभाव त्यांच्या लिहिण्यात आणि बोलण्यात नेहमीच दिसून येई. असे असले तरी डॉ. आंबेडकर धार्मिक होते. माणसाला धर्माची आवश्यकता असतेच असे त्यांना वाटत होते; परंतु तो धर्म सर्व प्रकारचे बौद्धिक आणि नैतिक स्वातंत्र्य देणारा असावा. डॉ. आंबेडकरांना सर्वांत चीड होती ती मानसिक गुलामगिरीची. त्यातूनच सामाजिक व धार्मिक गुलामगिरी निर्माण होते. येवला येथील धर्मांतर घोषणेपासून डॉ. बाबासाहेब सातत्याने या प्रश्नांचा विचार करीत होते. चौदा ऑक्टोबर १९५६ ला जेव्हा विचारांती सर्वांना घेऊन धर्मांतर




केले तेव्हा आपल्या भाषणात त्यांनी धर्मांतराची सर्वांगांनी भूमिका स्पष्ट केली. ते भाषण केवळ लोकनेत्याचे नव्हते. ते एका द्रष्ट्याचे, विचारवंताचे, तत्त्वज्ञाचे होते. त्यांची जनता बुद्धाला जाणत नव्हती. मुळात बौद्ध धर्म हा बुद्धिवंतांचा धर्म. तो या अडाणी जनतेला कसा कळणार? हिंदू धर्माच्या मानसिक जोखडातून त्यांना मुक्त करणे फार कठीण काम होते. काही काळानंतर माणसाला गुलामगिरीच प्रिय वाटू लागते. माणसाला स्वातंत्र्याचेही भय वाटते. डॉ. आंबेडकरांच्या कुठल्याही अनुयायांना बौद्ध धर्माचा तेवढा अभ्यास नव्हता व त्या अज्ञ जनतेला धर्म समजून सांगता येईल असा अधिकारही नव्हता. त्यामुळेच बाबासाहेबांनी अत्यंत तातडीने 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' हा ग्रंथ सिद्ध केला. त्यावेळी त्यांना मृत्यूचीही चाहूल लागलेली होती. एखादा नेता मरेपर्यंत देशाशी, समाजाशी आपल्या लोकोत्तर कार्याशी कसा प्रतिबद्ध असतो


त्याचे ते जागते उदाहरण होते. त्यांचा हा ग्रंथ जगाला दिलेली शेवटची अमूल्य भेट आहे. दलितांना समजेल, रुचेल, पचेल असा धर्मग्रंथ हाती असण्याची आवश्यकता होती. हे काम अतिशय तातडीने करणे आवश्यक होते; कारण त्यांना आपल्या मृत्यूची चाहूल लागलेली होती. अशा धर्मग्रंथाच्या अभावी धर्मांतर फसणे शक्य होते. बुद्धाच्या मृत्यूनंतर अशीच परिस्थिती निर्माण झालेली होती. बुद्ध काय म्हणाले याविषयी प्रचंड वादविवाद निर्माण झाले होते. त्यामुळे पहिली धम्मसंगीतिका बोलवावी लागली. बाबासाहेबांना हे माहिती होते, त्यामुळे ‘भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म’ हा ग्रंथ लिहूनच महापरिनिर्वाणाकडे गेले. हा एक ग्रंथ एका अर्थाने त्यांच्या नैतिक जबाबदारीचा व जाणिवांचा परमोत्कर्षच आहे. म्हणून या ग्रंथाकडे फार जबाबदारीने व संवेदनशीलतेने बघावे लागते. धर्म ही भारताची एक समस्या होती आणि बुद्ध त्यांचे उत्तर असे म्हणता येईल. डॉ. आंबेडकर धर्म आणि तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक होते. भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म लिहिताना बाबासाहेबांनी भारताची सर्व सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक पार्श्वभूमी लक्षात घेतली आहे. बौद्ध भिक्खू संघाच्या मार्फत जनप्रबोधनाचे प्रचंड काम बुद्धाने केले होते. भिक्खूंनी एका गावी थांबू नये. दोनदा जेवू नये असे कडक आदेश आहेत. बुद्धाने जगाला प्रथमच एक विश्वधर्म दिला. बाबासाहेबांनी ग्रंथ लिहिताना अश्वघोषाचे बुद्धचरित्रातील सरलता, काव्यात्मता व सौंदर्य घेतलेले आहे. पुस्तक सामान्य माणसांसाठी ते लिहीत होते. त्यामुळे कुठलीही विद्वतजडता येणार नाही याची त्यांनी काळजी घेतली. बुद्धाने काय त्याज्य ठरवले, कोणते बदल केले, काय स्वीकारले हे जागृतपणे त्यांनी टिपले आहे. त्यांचा हेतू धर्मशिक्षकाचा आहे. एखादा शिक्षक आपल्या अल्पबुद्धीच्या मुलालाही कळेल अशा कुशलतेने शिकवत असतो. त्यामागे त्याची विद्वता, कुशलता आणि करुणा असते. बाबासाहेबांनी महाबोधी सोसायटीला दिलेल्या लेखात म्हटले आहे की, विज्ञाननिष्ठ समाजाला बौद्ध धर्माशिवाय पर्याय नाही; अन्यथा तो समाज नष्ट होईल. विज्ञाननिष्ठा हाच बौद्ध धर्माचा पाया आहे. प्रज्ञेचा अर्थ सत्य शोधण्याची आंतरिक इच्छा व क्षमताच होय. म्हणून जे तर्क आणि विवेकाला पटणारे आहे तेच या ग्रंथात आले आहे. बट्रांडरसेलने म्हटले आहे की, मी कुठल्याही धर्माला मानत नाही. परंतु कुणी मला धर्म स्वीकारायला सांगितलाच तर मी बौद्ध धर्म स्वीकारीन. बुद्ध मांडताना बाबासाहेबांनी त्यांची विश्वात्मकता, क्रांतीगर्भता, विज्ञाननिष्ठा, प्रज्ञेचे स्वातंत्र्य या गोष्टी अधोरेखित केल्या. समता, स्वातंत्र्य, बंधुता ही तत्त्वे मी फ्रेंच राज्यक्रांतीतून घेतलेली नसून, मी ती बुद्धापासून घेतली आहेत असे त्यांनी म्हटले आहे ते उगीच नव्हे. हे जग कार्यकारण संबंधावर उभे आहे. त्याला शाश्वत नियंता नाही. त्यामुळे आपल्या सुख-दुःखाला, विनाशाला वा विकासाला आपणच कारणीभूत असतो. बुद्धाच्या पुढे जग दुःखमुक्त करणे हेच ध्येय होते. त्यांनी दुःखाचे कारण शोधले व अष्टांगमार्गाने जगाचा निरंतर विकास शोषणरहित व दुःखरहित पद्धतीने होऊ शकतो हेही सांगितले. काप्रासारख्या वैज्ञानिकाने संशोधनाअंती नमूद केले आहे की, बौद्ध धर्मातील संकल्पना एकविसाव्या शतकातील विज्ञानाला पूरक आहेत. नव्हे ते विज्ञानच आहे. बुद्धानंतर एक हजार वर्षे हा संदेश जगात विज्ञान आणि व्यापारात अग्रगण्य राहिला आहे. त्याचे अधःपतन झाले ते प्रतिक्रांतीमुळे. आपण हा ग्रंथ वाचताना बाबासाहेबांचेच नव्हे तर बुद्धाचेही सान्निध्य आणि प्रेम अनुभवतो.

***



**भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म**
**लेखक - डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
**सद्धम्मादित्य प्रकाशन**
**किंमत : २०० रुपये, पाने : ४४७**

# गायीच्या पाठीवरून पिसाट होतोय धर्मवाद



उत्तर प्रदेशात जेथे भगव्या वस्त्रातले बाबा थेट मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीत बसून धर्मकार्य करत आहेत तेथे म्हणजेच दादर बिसाहडा या गावात गोमांस ठेवल्याच्या केवळ संशयावरून लष्करातील एका जवानाच्या वडिलांना गोरक्षकांनी तुडवून तुडवून ठार केलं. यानंतर ही घटना अखलाख किंवा दादरी हत्याकांड या नावानं ओळखली जाऊ लागली. मोहम्मद अखलाख हे हत्या झालेल्याचं नाव. नौदलातला त्याचा मुलगाही जखमी झाला. गायीच्या रक्षणासाठी रक्षक इतके चवताळले होते की, घटनास्थळी आलेल्या पोलिसांसमक्ष त्यांनी मारहाण चालूच ठेवली. फ्रीजवर एक मांसाचा तुकडा होता; पण तो गायीचा नव्हता. केवळ संशयावरून एकाचा बळी गेला आणि ज्याने तो घेतला त्याने केलेल्या या धर्मकार्याबद्दल त्यांना बक्षीस काय मिळणार आहे ठाऊकाय? आगामी लोकसभा निवडणुकीत त्याला उमेदवारी मिळणार आहे. नवनिर्माण सेनेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी असलेल्या अमित जानीने ही घोषणा केलीय. एवढंच नव्हे तर धर्मकार्य करणाऱ्या अशा लोकांना धर्मक्षेत्राचा पाठिंबा मिळवण्यासाठी कृष्णाच्या मथुरेत धर्मसंसदही बोलावण्यात येणार आहे. ज्यांनी ज्यांनी धर्मकार्याच्या नावाखाली असे महान कार्य केले अशा आपल्या आणखी काही सदस्यांना उत्तर प्रदेश नवनिर्माण सेनेने (महाराष्ट्रातील मनसेशी काही संबंध नाहीय) उमेदवारी द्यायचं ठरवलं आहे. त्यात रामूलाल वैगर या आणखी एका धर्मवीराचा समावेश आहे. का तर त्याच्यावर अशाच एका कारणावरून एका मुस्लिमाची हत्या केल्याचा आरोप आहे. खरे तर मुस्लिमांच्या वाट्याला जे जातात तेच धर्मवीर होतात हे काही वेगळं सांगण्याची आवश्यकता नाही. आता प्रश्न आहे तो खुनाचा आरोप असलेल्यांना इतक्या इटपट जामीन कसा मिळाला आणि निवडणूक लढवून आपलं कर्तृत्व गाजवण्याचं बळ त्यांना कसं मिळालं? कर्नाटकात मंगळूरमध्येही गोमांस असल्याच्या संशयावरून दंगल घडवण्यात आली होती आणि यातील पोलखोल तेव्हा हयात असलेल्या पत्रकार गौरी लंकेश यांनीही केली होती. गेल्या साडेचार वर्षांत केवळ संशयावरून अनेकांचे बळी गेले आहेत.

गायींच्या रक्षणासाठी उत्तराखंड सरकारनं गायीला राष्ट्रमाता बनवण्याचा ठराव विधिमंडळात केलाय. जनावरांचं संवर्धन करण्याची जबाबदारी असलेल्या रेखा आर्य या मंत्र्याने ठराव आणला आणि तो एकमतानं मंजूर झाला. आता ठरावाला विरोध करण्याची हिंमत कोणामध्ये आहे? मांस ठेवल्याच्या संशयावरून जर हत्या होत असेल तर ठरावाला विरोध केल्यावर काय होईल? विशेष म्हणजे काँग्रेसनंही पाठिंबा दिला. उत्तराखंड असं एक राज्य आहे की तेथे गोशाळेतच गायी मरण्याचे प्रमाण अधिक आहे. आता गोशाळा चालवणाऱ्यांचा उद्धार करण्याचं महाराष्ट्र शासनानंही ठरवलं आहे. शाळा चालवणाऱ्यांना भरपूर आर्थिक मदत दिली जाणार आहे. या शाळांचे चालक अर्थातच गब्बर बनणार आहेत आणि इकडे रस्त्यावर प्लास्टिक, कचरा खाऊन मरणाऱ्या गायींची संख्या वाढतेच आहे. आता एकदा का गाय राष्ट्रमाता झाली की राष्ट्रवादाची व्याख्याही बदलावी लागेल. नागपूरच्या पशू संशोधन केंद्रातून कोणती व्याख्या बाहेर पडणार, याबाबत उत्सुकता आहे. उत्तराखंडात भाजपच्या आमदारानेच धमकी देऊन ठेवलीय की गाय लवकरात लवकर राष्ट्रमातेच्या श्रेणीत गेली नाही तर जमाव करून हत्या करण्याचे सत्र थांबवले जाणार नाही. या आमदाराचं नाव आहे टी राजा सिंह लोध.

गायीच्या या स्पर्धेत दक्षिण भारतही पुढं जाण्याचा प्रयत्न करतोय. द्राविड संस्कृती आणि पेरियार संस्कृतीचा भक्त असलेल्या तमिळनाडूत गायीला संस्कृत भाषा शिकवण्याचा निर्धार तेथील काही धर्ममार्तंडांनी घेतलाय. आता हे शिक्षण ऑनलाइन असेल की गोशाळेत खिचडी देऊन, यावर अजून प्रकाश पडलेला नाही. जर गायी संस्कृत शिकू शकल्या तर देश लवकरच धर्मराष्ट्राकडे जाणार आहे. संस्कृतचे वारसदार आपल्या गळ्यात इंग्रजीचा पट्टा बांधून सिलिकॉन व्हॅलीत गेले. आता गायीसाठीच्या संस्कृत शाळेसाठी ते तेथून पैसे पाठवतील. गुरुदक्षिणा असते तशी ही गोसंस्कृत दक्षिणा असेल. ज्ञानोबा माऊलींनं रेड्याला वेद शिकवला असं म्हणतात; पण आता रेडा ते गाय आणि प्राकृत ते संस्कृत असा हा प्रवास आहे. देवांना माणसांची भाषा कळत नाहीय. गायीच्या पोटात तर ३३ कोटी देव असतात. आता इंडेक्स वाढल्यानं जास्त असतील. या सर्वांनाच संस्कृत शिकता येणार. कदाचित त्यासाठी दीक्षित शास्त्रींची ट्यूशन लावली जाईल. अगोदर गाय साक्षर होईल मग भारत... अगोदर जनावर सुखी होईल मग माणूस... आधारकार्डाच्या जोरावर माणूस आणि गाय सुखी होईल. डार्विनच्या थेअरीनुसार अगोदर प्राणी मग मनुष्य प्राणी सुखी होईल.

आता गायीला आधारकार्ड देण्याचा विचार चालू आहे. मग पॅनकार्ड, मग आयकर सवलत, मग तिचे विक्रमी पुतळे, मग राष्ट्राकडून मिळणारे मानसन्मान आणि शेवटी या तंत्रयुगाचं नाव बदलून 'गाय युग' असं केलं जाईल. गायीच्या नावानं पक्ष येईल. मग स्क्रीनसेवर येईल. मग शहरातले सारे चौक तिच्या सात-बारावर नोंदवले जातील. 'एकदा तरी जन्म लाभावा गायीचा' अशी घोषणा भिंती-भिंतीवर लिहिली जाईल. जेथे सुंदर गाय असते तो देश सुंदर असतो असा नवा सिद्धांत येईल. एवढं सारं झालं की मग हिंदू राष्ट्र किती दूर राहील? झक्क मारत ते झुणका खाईल आणि चिकटेल की राष्ट्रमातेच्या पाठीला. किती छान! किती छान!! सत्तेचा मार्ग लोकशाहीतून जात असतो, राष्ट्राची निर्मिती लोकांच्या वासनेतून होत असते हे सारं राजकीय तत्त्वज्ञान कालबाह्य होईल आणि त्या जागी सत्तेचा मार्ग गायीच्या पाठीवरून जातो. सक्षम देश, सदृढ देश गोमूत्रातून घडत असतो असं शाळेतले मास्तर शिकवतील. चंद्रावर गायीसाठी राखीव जागा ठेवली पाहिजे आणि देशाच्या विकासातही राखीव कोठा ठेवला जावा, अशी मागणी होईल. गोरक्षकांना राष्ट्रभक्त असं प्रमाणपत्र मिळेल. मग पाठोपाठ पेन्शन आणि बस, दवाखाना मोफत... एक गाय काय काय घडवू शकते देवा...!

**- पंक्चरवाला**

***

477734930

# पारधी झाले पाटील

आपल्या देशात माणसाचा जन्म तसा खूप मोठा मजेशीर असतो. इथं माणूस म्हणून कुणी जन्माला येत नाही, तर जात, पंथ, धर्म म्हणून जन्माला येतं. जन्माला आलं की या साऱ्या गोष्टी त्याला एकदम फ्री मिळतात. फार तर घाऊक सेलमध्ये म्हणू या. अर्थात हे जन्माला आल्यावर घडतं. इंग्रजांनी त्या पुढं मजल मारली. आपल्या साम्राज्याला वारंवार सतावणाऱ्या दीड-दोन डझन जातींना त्यांनी गुन्हेगार जाती ठरवलं आणि कोंडून टाकलं तारांच्या कुंपणात. एक-दोन वर्षे नव्हे तर शंभर वर्षे तरी या जाती कुंपणात जगल्या. मेल्या तिथंच आणि जन्माला आल्या तिथंच. कायद्यानंच यांना जन्मजात गुन्हेगार ठरवलं गेलं होतं. याचा अर्थ या जातीमध्ये प्रत्येक जण गर्भाशयातच गुन्हेगार असतो. स्वाभाविकच तो गुन्हेगार म्हणूनच जन्माला येतो. अशा जातींपैकी पारधी एक. मांग, वडारी एक. अजून कुणी कुणी तरी आहेत. स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेनं सर्वप्रथम ही कुंपणं तोडायला लावली. नागरिक असा दर्जा त्यांना दिला. स्वातंत्र्य दिलं. डॉ. बाबासाहेबांच्या राज्यघटनेनं एका रात्रीत चमत्कार केला आणि सारे गुलाम मोकळे झाले. स्वतंत्र देशाचे नागरिक झाले.

कुंपणातून बाहेर पडल्यानंतरही या जातींच्या कपाळावर इंग्रजांनी मारलेला गुन्हेगार हा शिक्का पुसला गेला नाही. समाजांच्या मनातूनही ही गोष्ट गेली नाही. माणूस जन्मजात गुन्हेगार असतोच कसा? तो माणूस का नाही, असा प्रश्न का पडला नाही? त्याचं उत्तर कोणी शोधण्याचा प्रयत्न केला नाही. या गुन्हेगारांना गाव नाही, घर नाही, व्यवसाय नाही. शिक्षण नाही. मतदारयाद्यांमध्ये अपवादानंच नाव. आत्मसन्मान नाही. भाकरीच्या तुकड्यासाठी या जाती आजही भटकत आहेत. काही स्थायिक होत आहेत. स्वातंत्र्यात, विकासात स्पेस मागत आहेत. खरं तर राजर्षी शाहू महाराजांनी सर्वप्रथम काही गुन्हेगार जातींना स्थिर केलं. पुनर्वसन केलं. दरबारात नोकऱ्या दिल्या. संरक्षण विभागात नोकऱ्या दिल्या. ज्यांना व्यवस्थेनं चोर, गुन्हेगार ठरवलं होतं त्यांच्याकडेच तिजोऱ्या राखण्याचं काम दिलं. स्वातंत्र्यानंतरही या जातींची फरपट काही थांबलेली नव्हती. ती संपवण्यासाठी आंदोलनं होत राहिली. होत आहेत. मध्यंतरी ज्या ठिकाणी भटके, विमुक्त मोठ्या प्रमाणात आहेत



नारायण पवार



पिंटू काळे

अशा वसाहतींना गाव म्हणून दर्जा देण्यात आला. नाशिकजवळ असं एक पूर्ण गाव रामोशांचं आहे. रामवाडी असं त्याचं नाव. नंतर अध्यात्मातले महाराज तेथे घुसले हा भाग वेगळा.

आपल्याकडं गावात पोलिसपाटील पद अनेक वर्षे परंपरेनं चालत आलंय. सवर्णच या पदावर रहायचा. मग राज्यघटनेनुसार कायदा झाला. १९६७ पासून हे पदही राखीव ठेवण्यात आले. दलित, महिला आणि अल्पसंख्याक समूहातले लोकही पाटील होऊ लागले. पूर्वीच्या पाटलाच्या शेतावर बिगारी म्हणून काम करणाराही पाटील झाला. घरात कोंडली गेलेली महिलाही पाटील झाली. गुन्हेगारी जाती मात्र अपवादानंच या पदावर पोहोचायच्या. राज्यघटनेनं पुन्हा एकदा क्रांती घडवली आणि गुन्हेगार जातींना मारण्यात, खून करण्यात आघाडीवर असलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यात कसबे-तडवळ येथे एम.एड. झालेल्या नारायण पवार याने, तर शेजारीच चिकटून असलेल्या पिंटू काळे याने पाटीलकी मिळवली. तोही बारावी आहे. पोलिसांची डायरी ज्यांच्या नावानं मुद्दाम भरवली जाते त्या जातीतले तरुणच आता आपापल्या गावातील कायदा आणि सुव्यवस्था पाहणार आहेत. सामाजिक क्रांती म्हणतात ती यालाच! आणि तीच बाबासाहेबांना हवी होती. राजकीय लोकशाहीपेक्षा सामाजिक लोकशाहीचा आग्रह ते का धरत होते, हेही लक्षात येते. क्रांती घडवायला मदत करणारी ही राज्यघटना म्हणूनच जपली पाहिजे. धर्मवाद्यांपासून, जातीयवाद्यांपासून सुरक्षित ठेवली पाहिजे. राज्यघटनाच त्यांनी कुरूप केली तर काय राहील?

***

# मॅडम स्पीकर,
# बरे झाले बाहेर बोलला!



## मॅडम स्पीकर,
## ऑनरेबल सुमित्रा महाजन

बरे झाले एकदाचे आपण सभागृहाबाहेर मोकळेपणाने बोलला. नाहीतर लोकसभेच्या सभापतिपदाच्या खुर्चीत नियम-कायद्यांवर बोट ठेवून बोलावे लागते. डॉ. बाबासाहेबांचे कायदे तसं हलू देत नाहीत. तोल सांभाळून तारेवर चालायला लावतात.

मॅडम स्पीकर,

तुम्ही बाहेर बोलल्यामुळे तुमच्या भगव्या विचारात आम्हालाही सहभागी होता आलं. तुमची परवानगी न घेता तुमच्या विचारांचं पंक्चर काढता आलं.

मॅडम स्पीकर,

तुम्हाला ठाऊकच आहे की, अलीकडे भगवे लोक बाबासाहेबांचं नाव घेऊन कोणत्याही जत्रेत पावती फाडायचा प्रयत्न करतात. काही कथित आंबेडकरवादी भगव्याच्या सावलीत आल्याने तर भगव्याला चेवच फुटलाय. आपला बुरसटलेला विचार बाबासाहेबांच्या नावानं खपवायचा.

मॅडम स्पीकर,

एक हजार भगवे मिळून एकत्र आले आणि त्यांनी एक गोष्ट हजार वेळा खोटी बोलली की, रामाच्या कृपेने ती खरी होते असं त्यांचं म्हणणं आहे. अनेकदा ही तंत्रविद्या वापरून खोटी गोष्ट खरी करून दाखवलीय. आता तुमचंच बघा ना स्पीकर मॅडम. रांचीतल्या 'लोकमंथन'

कार्यक्रमात तुम्ही म्हणाला की, बाबासाहेबांना राखीव जागा फक्त दहा वर्षांसाठी हव्या होत्या; पण संसदेने म्हणजेच राजकारणाने त्या वाढवत वाढवत इथपर्यंत आणल्या. अर्थात, तुमचा भगवा पक्षही यात होता हे काही तुम्ही बोलला नाही आणि बोलणार नाही; कारण या देशात जेवढं काही वाईट ते काँग्रेस करतं आणि जेवढं काही सोज्वळ, मंगल असतं ते भाजप करतं.

मॅडम स्पीकार,

तुम्ही जे काही सांगितलं ते अर्धसत्य होतं. पण सभापती बोलताहेत म्हणून लोकांनी ते पूर्णसत्य मानलं असणार. स्वाभाविकच राखीव जागांना विरोध करण्याची आणि अनेक वर्षे तुमच्या मनात वळवळ करणारी मळमळ यशस्वी झाली. पण गंमत अशी आहे की, बाबासाहेबांनी राजकारणातलं आरक्षण विशिष्ट काळासाठी मागितलं होतं. बिगर राजकीय म्हणजे शैक्षणिक आणि नोकरीसाठीचं नव्हे. पण तुम्ही चलाखी वापरून दोन्ही आरक्षणांची भेसळ केली. मळमळ लोकांच्या गळी उतरवण्यात यशस्वी झालात.

बिगर राजकीय आरक्षणाची मर्यादा ठरवण्यात आलेली नाही; कारण हा विषय सामाजिक न्यायाशी, जातिअंताशी जोडला गेला आहे. जोपर्यंत सामाजिक, धार्मिक आणि अन्य प्रकारची पिळवणूक दलितांच्या वाट्याला येते. तोपर्यंत या राखीव जागा कायम राहणार आहेत. म्हणजे एका अर्थाने त्या कधी संपणार हे तुमच्या हातात आहे. जाती आणि धर्मावर आधारित राष्ट्रांची मागणी जोपर्यंत तुम्ही थांबवणार नाही आणि जाती संपवणार नाही तोपर्यंत कायम राहणार आहेत. आतापर्यंत तुमचा भगवा पक्ष रामाचं नाव घेऊन असा काहीतरी बकवास करायचा, आता तो भीमाचं नाव घेऊन करतोय एवढाच काय तो फरक!

मॅडम स्पीकर,

राजकीय आरक्षणाचा तुम्हाला इतका तिटकारा आहे तर आरक्षण नसताना वर्षानुवर्षे जे निवडून येतात त्यांना का रोखत नाही? देशातले पूर्वाश्रमीचे बहुतेक राजे, सरदार, जहागिरदार आणि अन्य नेते सतत निवडून येतात. त्यांच्याविषयी बोलण्याचं धाडस का दाखवत नाही? तुम्ही स्वतःही अनेकदा निवडून आलात. मोदी, अडवाणी अजून किती नावं सांगायची. सत्ता, सामर्थ्य याच्या जोरावर तुम्ही तुमचे राजकारण जणू काही आरक्षणातच घुसवल्यासारखे आहे. स्पीकर मॅडम, आपल्याकडे काही जण दहा-अकरा वेळा संसदेत निवडून आले. काय त्या राखीव जागा होत्या? कुटुंबेच्या कुटुंबे निवडून येतात, त्या काय राखीव जागा आहेत का? नाहीत ना मॅडम! दलितांच्या राजकीय आरक्षणाला मुदतवाढ दिली की तुमचं मन महाजनाऐवजी लघुजन का होतं? असो. शेवटी तुम्ही जनतेच्या प्रतिनिधी, तुम्ही बाहेर बोलल्यानं आम्हाला मन मोकळं करता आलं.

***


पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
द पीपल्स पोस्ट

**द पीपल्स पोस्ट ची वर्गणी बँक ट्रान्सफरने भरण्यासाठी तपशील**

बँक :- स्टेट बँक ऑफ इंडिया, समर्थ नगर शाखा, औरंगाबाद.

खाते :- द पीपल्स पोस्ट

खाते क्र :- ३७८५६३७३४१९

आयएफएससी क्र :- SBIN0007919

एमआयसीआर क्र :- ४३१००२०१०

टीप :- पैसे ट्रान्सफर केल्यानंतर ७३५००९१५६९ या क्रमांकावर एसएमएसद्वारेअथवा thepeoplespost2014@gmail.com या ईमेलवर कळवावे.

**वार्षिक वर्गणी :- ५०० रू.**

**सहामाही वर्गणी :- ३०० रू.**

चेक/डीडी **"द पीपल्स पोस्ट"** या नावाने व्यवस्थापक **'द पीपल्स पोस्ट'** कार्यालय सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेट जवळ, औरंगाबाद- ४३१००१ या पत्त्यावर पाठवावेत.

# कोल्हांटउडी

ते म्हणाले
आम्ही तुम्हाला स्वामीनाथन देऊ
वाटलं चला
रानावनातल्या वनवासी रामाला
आयोध्येत शोधणाऱ्यांना
सापडला एकदाचा राम
आम्ही आमचा अंगठा गहान ठेऊन
त्यांना सिंहासन बहाल केलं
वाटलं हे तरी निघाले
आपणाला समजुन घेणारे
पण ह्यांनी तर अशी पल्टी मारली
कोर्टात कोल्हांटीउडी मारून
शपथेवर सांगितलं
आम्ही खोटं बोललो, चुनावी जुमला म्हणून
आमची तर गत अशी झाली
डूरळली मेंढी आल्हाद जाऊन पडली
तोंडात लांडग्याच्या
या सगळ्या प्रकाराला वैतागुन
आम्ही जाऊन बसलो जंतर मंतर वर
महीनेन्महिने
स्वत:कडं लक्ष वेधण्यासाठी सिंहासनाचं
चघळला कडबा, खाल्लं गवत खाल्ला गूमूत
सिंहासनानं ढुंकुनही पाहिलं नाही
शेवटी आमचं आम्हालाच
उचलून चंबुगबाळं
परत फिरावं लागलं रानाकडं
लाँग मार्च करून पाहिला
ढीगभर मिळाली सहानुभुती
रात्रीच्या पायफुटिला पण पान्ह्याचा पत्रा नाही
केला संप देशव्यापी
मोल मजुरांसारखा
पण आमच्यात एकजुट कुठाय
कुणाला वेठीला धरण्यासाठी
रोजच भावाभावातुन
फुटणारे फटके आम्ही
आम्हाला फोडणं किती सोपं
झोडणं तर त्याहून सोपं

—इंद्रजित भालेराव



# कोण काय बोलतं...



भाजपविरोधात आपोआप
पर्याय होईल.

**- चंद्रबाबू नायडू**





रुपया भुईसपाट झाला असताना
मोदींचे मौन का?

**- राहुल गांधी**

स्वदेशी यानातून २०२२
पर्यंत अंतराळ प्रवास
करा.

**- बिरेंदर कुमार, इस्त्रो**


प्रकाश आंबेडकरांनी भाजपाला थेट
पाठिंबा द्यावा, दलितांचे कल्याण होईल.

**- रामदास आठवले**

---

आगामी निवडणुकांमधून
काँग्रेसने हिमालयात
जाण्याची तयारी करावी.

**- शिवसेना**



काँग्रेसने देशासाठी बलिदान दिले.
पण भाजप आणि संघाच्या घरातील
कुत्राही मेला नसताना हे देशप्रेमाचा
आव आणत आहेत.

**- मलिकार्जुन खारगे**

भारतातला पगार २०१९ मध्ये दहा
टक्क्याने वाढून आशिया खंडात
एक नंबरचा होईल.

**- एक अहवाल**

---

आता निवडणुका झाल्यास लोकसभेत
भाजपला २४२ तर काँग्रेसला शंभरपेक्षा
कमी जागा. मोदी जादू कमी झाली.

**- एबीपी सर्व्हे**



राजकीय आरक्षण
रद्द करा.

**आनंदराज आंबेडकर**



माझं शरीर कुरतडून आईएसचे आतंकी तरूण
आपली भूक भागवत होते.

**- नादिया मूराद, शांतता नोबेल विजेता**

पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

# वार्षिक वर्गणीदारांना

## २०% सवलत!

## देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक

---

**हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!**

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदाराचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा :

कार्यालय : ११ तळमजला, बी ब्लॉक, लक्ष्मी निवास,
जे.के. सावंत मार्ग, यशवंत नाट्य मंदीरा समोर,
माहीम (वेस्ट), मुंबई- ४०००१६

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ६०० | ५०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ३०० | ३०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | १५० | १५० | |

(वार्षिक विशेषांक - ६) / (६ महिने-३)

चेक किंवा डीडी ने पेमेंट

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. --------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. --------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ ☐ VISA ☐ कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : ------------------------------ जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : ---------------------------------------------पत्ता : ---------------------------

---------------------------------------------शहर : ------------------------------------

राज्य : ----------------------- पिन कोड : ------------------ फोन नं. (घर) : -----------------------

मो. नं. : ----------------------इ-मेल : ----------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता
२९ ऑगस्ट ते १२ सप्टेंबर २०१८

व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२
किंवा ७३५००९१५६९ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा
thepeoplespost2014@gmail.com

लॉग ऑन करा
www.thepeoplespost.com

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.


Haldiram's
NAGPUR
TASTE OF TRADITION
Sweets & Namkeen
zubaan ka
zaika badal de
Haldiram's
TASTE OF TRADITION
INDIAN SWEETS / BONBONS INDIENS
PRODUCT OF INDIA / PRODUIT DE L'INDE
Soan Papdi
NET WEIGHT : 1 kg (500 g x 2 unit)
INDIAN SNACKS
CASSE-CROÛTE INDIENS
ALOO BHUJIA
Rasgulla
Rasgulla
Gulab Jamun
Gulab Jamun
visit our website at www.haldirams.com